
# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर, २०२६
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक नववा




विशेष लेख

**प्रा. डॉ. भालबा विभुते**

## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी
# ग्रंथजगत

♦ सप्टेंबर २०२६ ♦ वर्ष सव्विसावे ♦ अंक नववा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा
ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

मेहता
पब्लिशिंग
हाऊस


## – अनुक्रमणिका –



संपादकीय ४
पुरस्कार १०
श्रद्धांजली १२
विशेष लेख १४
**पुस्तकाच्या पानांतून**
छाटितो गप्पा २४
मराठ्यांचा इतिहास खंड १: शिवशाही ३६
ज्ञानयोगी एकनाथ ४८
अभिप्राय ५८
दिनविशेष ६२



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## उद्याच्या भारताचे खरे शिक्षक

'National economic development is powered by competition. Competition is powered by knowledge. Knowledge is powered by technology and inovation.' (स्पर्धा असेल तरच देशाचा आर्थिक विकास होतो. ज्ञान असेल, तर स्पर्धा करणे शक्य असते. तंत्रज्ञान आणि नव्या कल्पना, नवी पद्धत यांनी ज्ञान वाढते.)

**- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम**

खरंच... शिक्षण असेल तरच जुन्या-नव्याची अचूक सांगड घालता येते. शिक्षण हे केवळ अक्षरांची ओळख किंवा पदव्या मिळवण्याचं साधन नाही, तर ते समाजपरिवर्तनाचं आणि राष्ट्रनिर्माणाचं सर्वांत प्रभावी माध्यम आहे. दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा 'शिक्षक दिन' आपल्याला याच मूळ तत्त्वाची आठवण करून देतो. आजच्या डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेत(AI) वावरणाऱ्या आधुनिक भारताकडे पाहताना हे जाणवतं की, आपल्या शिक्षणव्यवस्थेचा पाया ज्या थोर महापुरुषांनी रचला, त्यांच्या विचारांचं आचरण करणं आजही आवश्यक आहे. भारताला महासत्ता बनवण्याचं स्वप्न पाहत असताना, या वैचारिक विचारांची गरज



भाषणांतून व्यक्त न होता ती पुढील पिढ्यांच्या पाठ्यपुस्तकांत उतरली पाहिजे; हेच आजच्या शिक्षण व्यवस्थेपुढील मोठं आव्हान आहे.

'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्' हे तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक आणि आदर्श शिक्षक होते. ''शिक्षकांचं मन हे देशातील सर्वोत्तम मन असलं पाहिजे,'' हा त्यांचा विचार आजच्या बदलत्या युगातही लागू पडतो. आज गुगल किंवा एआयसारख्या तंत्रज्ञानामुळे माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी त्या माहितीचं ज्ञानात आणि ज्ञानाचं आचरणात रूपांतर करण्यासाठीची मदत केवळ संवेदनशील शिक्षकच करू शकतो हेही खरंच.

एकेकाळी भारतातील सामाजिक विषमतेची भिंत पाडून शिक्षणाचा अधिकार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचं क्रांतिकारी कार्य 'महात्मा जोतिराव फुले' आणि 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' यांनी केलं. महात्मा जोतिराव फुले यांनी ''विद्येविना मती गेली...'' या ओळींमधून अज्ञानाचं भीषण चित्र रेखाटलंच; परंतु इतक्यावरच न थांबता २४ सप्टेंबर, १८७३ रोजी महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीची पायाभरणी करणाऱ्या 'सत्यशोधक समाजा'चीही स्थापना केली. सत्यशोधक समाज ही महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक क्रांतीची एक अत्यंत महत्त्वाची चळवळ होती. या संस्थेच्या माध्यमातून शोषित आणि बहुजन समाजाला गुलामगिरीतून मुक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. तर, सावित्रीबाईंनी अंगावर शेण-दगड झेलत मुलींसाठी शाळा सुरू केली. फुले दांपत्याचा विचार माणसाला गुलामगिरीतून आणि अंधश्रद्धेतून मुक्त करणारा होता. याच विचारांची 'महात्मा : महात्मा जोतिराव फुले यांची चरितकहाणी' (मराठी व इंग्रजी भाषेत), 'ज्ञानाई सावित्रीबाई फुले' आणि 'शेतकऱ्याचा आसूड' ही तीन अजरामर पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनात सदैव उपलब्ध आहेत.

तसंच, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांनी शिक्षण क्षेत्रात केलेली वैचारिक आणि व्यावहारिक क्रांती अफाट आहे. ''शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे आणि ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही,'' हा विचार शोषित आणि वंचितांना ताकद देणारा ठरला. 'बुद्धभक्त : डॉ. बाबासाहेब आंबेडकर' आणि 'बाबासाहेब घडताना' याही दोन महत्त्वाच्या पुस्तकांचा समावेशही मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनात आहे.

दुसरीकडे, 'राष्ट्रपिता महात्मा गांधी' यांनी शिक्षणाला श्रमाची आणि स्वावलंबनाची जोड दिली. त्यांनी मांडलेली 'नई तालीम' संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्यावर भर देणारी होती. आजच्या 'कौशल्याधारित शिक्षणा'ची पाळंमुळं महात्मा गांधींच्या याच विचारांमध्ये रुजलेली आहेत. अशा व्यक्तिमत्त्वाला समजून

घेण्यासाठी आमच्या 'मोहनदास करमचंद गांधी', 'दुसरे प्रॉमिथियस : महात्मा गांधी', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे' आणि 'फ्रीडम ॲट मिडनाइट' यांसारख्या प्रसिद्ध पुस्तकांचा उपयोग नक्की करता येईल.

एकीकडे युगप्रवर्तक स्वामी विवेकानंदांनी दिलेला मुख्य संदेश असा होता की, 'मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी पाश्चात्त्य देशांचे भौतिक विज्ञान आणि भारताचे आध्यात्मिक ज्ञान एकत्र येणे गरजेचे आहे.' या दोन्ही संस्कृतींनी एकमेकांकडून चांगल्या गोष्टींची देवाणघेवाण करून प्रगती साधली पाहिजे. अशा विवेकानंदांच्या विचारसरणीला स्मरून बदलत्या काळात देशाच्या वैज्ञानिक व औद्योगिक प्रगतीसाठी दर्जेदार शिक्षणाची गरज खरंच का असते, याचं उत्तम उदाहरण टाटा समूहानं घालून दिलं आहे. जे. आर. डी. टाटा यांच्या दूरदृष्टीतून 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डामेन्टल रिसर्च' (TIFR) आणि 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' (IISc)सारख्या संस्था उभ्या राहिल्या. रतन टाटा यांनी ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च तंत्रज्ञानापर्यंत कोट्यवधी रुपयांचं योगदान दिलं. हा विचार आजच्या 'स्टार्ट-अप' युगाला नवी दिशा देणारा आहे. तसंच अखेरच्या श्वासापर्यंत स्वतःला शिक्षक मानणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे विद्यार्थ्यांचे लाडके मार्गदर्शक होते; कारण ते सांगायचे की, 'स्वप्नं ती नाहीत जी आपण झोपेत पाहतो, स्वप्नं तर ती असतात जी आपल्याला झोपूच देत नाहीत.' वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि नवनवीन प्रयोग (Creativity and Innovation) करण्याची वृत्ती जोपासली जावी आणि तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी करता यावा, हा त्यांचा विचार भारताला प्रगत राष्ट्र बनवण्यासाठी आवश्यक आहे असं वाटतं. म्हणूनच स्वामी विवेकानंद, टाटा समूह आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना समजून घेताना 'आधुनिक भारताचे प्रेषित : स्वामी विवेकानंद', 'जे. आर. डी. टाटा : एक चतुरस्त्र माणूस', 'टाटा एका कॉर्पोरेट ब्रॅन्डची निर्मिती', 'अदम्य जिद्द', 'टर्निंग पॉइन्ट्स' अशा मेहता पब्लिशिंग हाऊसच्या काही खास पुस्तकांची मदत होते.

त्याचबरोबर 'नवभारताचे शिल्पकार' वीर संघवी, 'असे घडले सहस्रक' निरंजन घाटे, 'नोबेल ललना भाग १ - २' मीरा सिरसमकर आणि 'मी मलाला' अशीही काही आमची पुस्तकं शिक्षण का महत्त्वाचं असतं, त्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात किंवा आयुष्याच्या कोणत्या दिव्यातून जावं लागतं यावर प्रकाश टाकणारी आहेत. लहान मुलांच्या विश्वातही दोन शिक्षक लहान वयातील मुलांना साध्या-सोप्या भाषेत विज्ञानकथा व विज्ञान प्रयोग यांची अवांतर वाचनातून ओळख करून देतात. 'डॉ. संजय ढोले' यांच्या विज्ञानकथांच्या तर, 'डी. एस. इटोकर' यांच्या

विज्ञान प्रयोगांच्या पुस्तकांचं मेहताच्या वाचकांवर वेगळंच गारूड आहे.

थोडक्यात सांगायचं तर, या सर्व महान विभूतींच्या शिक्षणविषयक विचारांची गोळाबेरीज म्हणजेच आधुनिक भारताचा शैक्षणिक आत्मा आहे. सध्याच्या ढासळत चाललेल्या शैक्षणिक मूल्यांचं पुनर्वसन किंवा पुनर्विकसन होणं खूप आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा वेळ आणि त्यांच्या जडणघडणीचा काळ हा अतिशय मौल्यवान आहे हे शिक्षण क्षेत्र चालवणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवं. यासाठी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण : २०२०' हे आमचं पुस्तक संग्रही ठेवण्यासारखं आहे.

या शैक्षणिक मूल्यांवर भर देणाऱ्या विचारांना आपल्या शैक्षणिक रचनेत प्रत्यक्ष उतरवणं आणि देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार, मूल्याधिष्ठित, शैक्षणिक घोटाळेविरहित व कौशल्याधारित शिक्षण देत उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणं हाच आपल्या सर्वांचा खरा संकल्प असायला हवा... नाही का?

अखिल मेहता

# चाहूल दिवाळी अंकाची!

**ते आहे...**

पुस्तकाचं अंतरंग उलगडणारं...

विविध रंगांतून बोलणारं... भाववैविध्य टिपणारं...

**पण,**

खरंच ते घडतं कसं..? खरंच बोलतं कसं..?

खरंच वाचकांना भावतं कसं..?

**त्याला म्हणतात तरी काय..?**

उत्तर :-

## 'मुखपृष्ठ'

या विषयाला विविध अंगांनी भिडण्याचा, त्याची निर्मितिप्रक्रिया जाणून घेण्याबरोबरच त्याचं बहुरंगी सौंदर्य उलगडण्याचा एक अनोखा प्रयत्न...

तर वाचक हो, सज्ज व्हा...

दिवाळी अंकातून या विषयाचे कंगोरे टिपण्यासाठी!!

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**



टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
BOOK CLUB
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर
– थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अँड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books

# पुरस्कार

## पर्वणी पुरस्कारांची..!

**नवी दिल्ली :** 'द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' (FIP) तर्फे दिला जाणारा २०२६चा 'अवॉर्ड्स फॉर एक्सलन्स इन बुक प्रोडक्शन' हा पुरस्कार सोहळा २२ ऑगस्ट, २०२६ रोजी नवी दिल्ली येथील द क्लॅरिजेस इथे पार पडला.

या पुरस्कार सोहळ्यात 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या दोन पुस्तकांना पुरस्कार मिळाले. 'गिनीजगाथा' या राजेश पांडे लिखित माहितीपर पुस्तकाला संदर्भग्रंथ प्रकारात 'तिसरे' आणि 'हॅच्युकीसुनास्की' या आबा महाजन लिखित पुस्तकाला बालसाहित्य प्रकारात 'पहिले' पारितोषिक प्राप्त झाले आहे.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या संपूर्ण टीमचे अभिनंदन..!

◆







**नवी संहिता... नवा आशय...**

मराठ्यांचा इतिहास
खंड २

## ।। पेशवाई ।।

**डॉ. जयसिंगराव पवार**





पेशवाई कालखंडाचं अभ्यासपूर्ण,
ससंदर्भ दर्शन

**किंमत : ६५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## द सायलेंट फिल्म
### दादासाहेब फाळके
१८७० - १९४४

**शरयू फाळके - सम्मनवार**

अनुवाद
**नीता गद्रे । इंदुमती पोळ**




भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या
जीवनकहाणीबरोबर उलगडणारा मूकपटांचा इतिहास

**किंमत : ३९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# श्रद्धांजली

## ‘डोह’कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी कालवश

**कराड :** मराठी ललित साहित्याला आपल्या लेखणीने समृद्ध करणारे ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी हे ६ ऑगस्ट रोजी अनंतात विलीन झाले. श्रीनिवास कुलकर्णी ‘मौज’चे दीर्घकाळ संपादक होते. १९६५साली आलेला त्यांचा पहिला ललितलेख संग्रह ‘डोह’ने वाचकांना ललित साहित्याची अनोखी अनुभूती दिली. त्यामध्ये लेखकाचे जन्मस्थान औदुंबर, तिथला निसर्ग आणि बालपणीच्या आठवणी यांचे सुरस वर्णन वाचायला मिळते.

‘डोह’शिवाय त्यांचे ‘सोन्याचा पिंपळ’, ‘कोरडी भिक्षा’, ‘पाण्याचे पंख’ हे ललित लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील काव्यात्मकता, निसर्गातील सूक्ष्म अनुभव आणि ओघवती शैली. त्यांच्या लिखाणाने मराठी ललित साहित्याला नवी उंची प्राप्त करून दिली.

श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना मेहता पब्लिशिंग हाऊसकडून भावपूर्ण श्रद्धांजली!

## ज्येष्ठ लेखक डॉ. अरविंद लिमये कालवश

वयाची साठ वर्षं वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉ. अरविंद लिमये यांची प्राणज्योत १७ ऑगस्ट, २०२६ रोजी मालवली. पनवेल येथील ‘लिमये हॉस्पिटल’मध्ये ते फिजिशियन व संमोहनतज्ज्ञ अशा दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडायचे.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित त्यांच्या ‘अन्नपुराण’ या पुस्तकातून आहार आणि त्यातील मूलद्रव्यांचे विवेचन सोप्या भाषेत वाचायला मिळते.

डॉ. अरविंद लिमये यांना मेहता पब्लिशिंग हाऊसकडून भावपूर्ण श्रद्धांजली!

## व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख कालवश

**पुणे :** ज्येष्ठ मराठी भाषा अभ्यासक व व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख यांनी वयाच्या १०१व्या वर्षी पुण्यात अखेरचा श्वास घेतला. मराठी भाषाशास्त्र आणि व्याकरणाच्या क्षेत्रात त्यांचं अमूल्य योगदान आहे.

छत्रपती संभाजीनगर इथल्या मिलिंद महाविद्यालयात अध्यापनानंतर त्या मुंबईच्या एसआयईस कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून रुजू झाल्या. तिथे त्यांनी दीर्घ काळ अध्यापक म्हणून काम केलं. तसेच मराठी विभागप्रमुख ही जबाबदारी सांभाळली. शालेय व महाविद्यालयीन स्तरावर त्यांनी तब्बल चौतीस वर्षं मराठी विषयाचं अध्यापन केलं. त्यासोबत 'बालभारती'च्या मराठीच्या पुस्तकांचं सात वर्षं संपादन केलं.

प्रा. यास्मिन शेख या प्रमाणभाषेसाठी आग्रही होत्या. विशेषत: वैचारिक लेखनात भाषा प्रमाणच असायला हवी असं त्यांचं ठाम मत होतं.

'मराठी शब्दलेखनकोश', 'सुगम मराठी व्याकरणकोश', 'मराठी लेखन मार्गदर्शिका' या ग्रंथांद्वारे यास्मिन शेख यांनी मराठी भाषशास्त्राच्या वाङ्मयामध्ये विपुल भर घातली.

अशा थोर भाषा अभ्यासक व व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख यांना मेहता पब्लिशिंग हाऊसकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

◆

# विशेष लेख



## शिक्षण : परीक्षांपलीकडचे

'नीट' परीक्षा पेपरफुटीच्या निमित्ताने जून, जुलै २०२६ मध्ये नव्याने उदयास आलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी'ने (CJP) दिल्ली येथे जंतरमंतरवर सुरू केलेलं आंदोलन, त्यात सहभागी झालेले लाखो युवक आणि त्यास संपूर्ण भारतातून मिळालेला प्रचंड प्रतिसाद याच्या दबावामुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. लगेचच संसदेच्या अधिवेशनात केंद्र सरकारने पेपरफुटी संदर्भात कडक दंडात्मक कारवाई करणारा कायदा हा संसदेत संमत केला. एवढंच नव्हे तर परीक्षांमध्ये असे गोंधळ होऊ नयेत आणि परीक्षा सुरळीत पार पडाव्यात या संदर्भात शासनास शिफारशी कराव्यात यासाठी श्री. नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार कृती दलाची (टास्क फोर्स) स्थापना केली. परीक्षा सुधारणांसंबंधी या कृती दलाकडून प्राप्त होणाऱ्या शिफारशी अमलात आणल्या जातील की भूतकाळातील आयोगांच्या शिफारशींप्रमाणे त्याही धूळ खात पडतील यावर आताच भाष्य करणं योग्य ठरणार नाही. तथापि, नंदन निलेकणी टास्क फोर्सच्या शिफारशी अमलात आणल्या तरी या आंदोलनातून पुढे आलेले प्रश्न सुटतील असं समजणं भाबडेपणाचं ठरेल.



'नीट' परीक्षा पेपरफुटी निमित्ताने सुरू झालेलं आंदोलन हे खरं तर एकूणच भारतातील विस्कळीत शिक्षणव्यवस्थेच्या संदर्भात सामान्य माणसाला विचार करण्यास प्रवृत्त करतं. परीक्षा म्हणजे शिक्षण यांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा विचार करण्याची आवश्यकता या निमित्ताने अधोरेखित झाली आहे.

शिक्षणात प्रामुख्याने सर्वसमावेशक अभ्यासक्रम आणि त्याची लवचीकता, ते शिकवणारे शिक्षक आणि त्यांचं स्वातंत्र्य, विद्यार्थी आणि त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती, १०० टक्के पटनोंदणी आणि गळती थांबवणं (प्रामुख्याने शालेय शिक्षण स्तरावर), आवश्यक उपलब्ध भौतिक आणि शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सवलती आणि शिष्यवृत्ती, शिक्षण संस्थांची स्वायत्तता, सक्तीचं आणि मोफत शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण, अध्यापन, त्याचबरोबर परीक्षा व मुख्यतः शिक्षणावरील गुंतवणूक आणि अशाच इतर घटकांचा एकत्रित विचार म्हणजेच शिक्षण व्यवस्थेचा विचार. हे पाहता फक्त परीक्षा सुधार म्हणजे शिक्षण सुधार अशा संकुचित दृष्टीने शिक्षणाकडे पाहणे देशाच्या भविष्यकालीन विकासाच्या दृष्टीने मारक ठरू शकतं.

शिक्षण हे व्यक्तिविकासाचं आणि अर्थातच समाजविकासाचं एक प्रभावी साधन आहे, हे अनेक शैक्षणिक आयोगांनी वेगवेगळ्या पद्धतीने अधोरेखित केलं आहे. २०२०च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातही त्याची अत्यंत समर्पक शब्दांत नोंद घेण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे -

''या शिक्षणव्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेला आणि (सहृदयता) करुणा, सहानुभूती, धैर्य आणि चिकाटी, विज्ञानाधिष्ठीत कल व रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्ये असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे. याचा उद्देश आपल्या घटनेद्वारा परिकल्पित न्याय्य, सर्वसमावेशक आणि बहुलतावादी समाजाच्या निर्मितीमध्ये सहभाग घेणारे, कार्यक्षम आणि चांगल्या प्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे, असा आहे.''

धोरणात पुढे असंही म्हटलं आहे -

''ज्या संस्थेत प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्याला इथे आपुलकीने वागवले, आपले स्वागत केले जाते असे वाटते आणि त्याची जिथे काळजी घेतली

जाते, जिथे एक सुरक्षित आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण असते, जिथे सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध अनुभव प्रकार उपलब्ध करून दिले जातात आणि जिथे शिकण्यासाठी चांगल्या पायाभूत सुविधा आणि उपयोगी संसाधने उपलब्ध असतात, ती खरी चांगली शिक्षण संस्था असते. या सर्व गोष्टी साध्य करणे हे प्रत्येक शैक्षणिक संस्थेचे ध्येय असले पाहिजे. मात्र, त्याच वेळी विविध संस्था आणि शिक्षणाच्या विविध टप्प्यांमध्ये सुलभ सहयोग आणि समन्वय असणे आवश्यक आहे.''

एवढ्या व्यापक अर्थाने धोरणाची तत्त्वं स्पष्ट केलेली असताना २०२०च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतुदींत त्याचं म्हणावं तेवढं प्रतिबिंब पडलेलं दिसत नाही आणि त्या दिशेने धोरणात्मक तत्त्वप्रणाली प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने आवश्यक पावलं टाकली जाताना आढळत नाहीत, असं खेदाने म्हणावं लागेल.

याचं उदाहरण घ्यायचं झाले तर, 'शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करणे आणि शिक्षण सर्वत्र आणि सगळ्या स्तरांवर पोहोचेल हे सुनिश्चित करणे' या तरतुदीबद्दल बोलता येईल. मुळात औपचारिक शिक्षणाची सुरुवात शालेय शिक्षणापासून होते. त्यादृष्टीने शालेय स्तरावर १०० टक्के पटनोंदणी हे धोरण सर्व शिक्षा अभियानात मान्य केलं होतं. त्याचा पाठपुरावा 'राइट टू एज्युकेशन २००९' मधील तरतुदींमुळे करणं शक्य होतं. याचाच पुनरुच्चार २०२०च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात केला आहे; परंतु प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. त्यादृष्टीने 'स्कूल एज्युकेशन सिस्टीम इन इंडिया : टेम्पोरेल ॲनालिसिस ॲन्ड पॉलिसी रोडमॅप फॉर क्वालिटी एन्हान्समेन्ट' हा नीती आयोगाचा अहवाल पाहता येतो. २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकातील प्राथमिक शिक्षणाच्या वास्तवावर हा अहवाल प्रकाश टाकतो. या अहवालानुसार या संदर्भातील दशकात देशातील लाखभर शाळा बंद झाल्या.

**शाळांची स्थिती**

| **शाळा** | **२०१४-१५** | **२०२४-२५** |
|---|---|---|
| एकूण शाळा | १५ लाख १६ हजार | १४लाख ७० हजार |
| सरकारी शाळा | ११.०७ लाख (७३%) | १०.१३लाख (६९.९%) |

| | | |
|---|---|---|
| अनुदानित शाळा | ८३ हजार (५.५%) | ७९हजार (५.४%) |
| खासगी मान्यताप्राप्त शाळा | २.८८ लाख (१९%) | ३.३९लाख (२३%) |
| मदरसा, तत्सम शाळा | ३८ हजार (२.५%) | ३९हजार (२.७%) |

*(संदर्भ : लोकसत्ता - २६ मे, २०२६)*

१. यामध्ये ९४ हजार सरकारी शाळा आणि चार हजार सरकारी अनुदानित शाळा बंद पडल्याचे स्पष्ट होते.

२. खासगी शाळा ५१ हजारांनी वाढल्या आहेत.

अहवालात विद्यार्थी संख्येबाबत भाष्य केलं आहे. २०१४-१५ला प्रवेशित विद्यार्थी संख्या २६.९५ कोटी होती ती २०२४-२५मध्ये २४.६९ कोटी झाली. म्हणजेच विद्यार्थी संख्येतही २.२६ कोटीची घट झाली आहे. याचा फटका वंचित समाज घटकांतील मुला/मुलींना बसतो. ग्रामीण, दुर्गम भागातील प्रादेशिक विषमता, पायाभूत सुविधा, शिक्षकांची कमतरता (१,०४,१२५ शाळा एक शिक्षकी आहेत) यामुळेही अशा भागातील मुलं शिक्षणापासून वंचित राहतात. महाराष्ट्राचंच उदाहरण घेता येईल. २०२४-२५मध्ये ३,४६५ अशी गावं, पाडे, वस्त्या होत्या की जिथे घराजवळ शाळा नव्हती. ही संख्या २०२५-२६ला चार हजाराच्या वर गेली आहे.

दुसऱ्या बाजूला खासगी शाळांची संख्या ५१ हजारांनी वाढली आहे. म्हणजे शिक्षणाचं खासगीकरण वाढत आहे. भारताच्या संविधानात ६ ते १४ वर्षं वयोगटातील (राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील तरतुदी पाहता ३ ते १८ वयोगट) मुला/मुलींना मोफत आणि सक्तीचं शिक्षण देण्याची तरतूद आहे. ती कल्याणकारी राज्याची मुख्य जबाबदारी आहे. प्रत्यक्षात मात्र वस्तुस्थिती तशी नाही हे खासगी शाळांच्या (३ लाख, ३९ हजार) संख्येवरून स्पष्ट होतं. यास शासनाची उदासीनता जशी कारणीभूत आहे

तशी पालकांची मानसिकताही जबाबदार आहे. पालकांचा सरकारी शाळांच्या गुणवत्तेबद्दल नकारात्मक दृष्टिकोन, इंग्रजी माध्यमाचं आकर्षण ही मानसिकताही खासगीकरणाच्या वाढीस कारणीभूत आहे.

सुदृढ शिक्षण व्यवस्थेसाठी आर्थिक गुंतवणूक महत्त्वाची असते. शिक्षणासारख्या क्षेत्रात होणारी आर्थिक गुंतवणूक विकास प्रक्रियेस गती देणारी आणि भविष्यकालीन प्रगतीसाठी आवश्यक पूर्वअट असते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०मध्ये अनेक आकर्षक तरतुदी केल्या आहेत. त्यात कोठारी आयोगाने १९६६मध्ये शिक्षणावर जीडीपीच्या सहा टक्के खर्चाची तरतूद असावी, त्याचा पुनरुच्चार केला आहे; परंतु ते अद्याप स्वप्नच राहिलं आहे. २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकामध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च जीडीपीच्या तुलनेत ३.८७ ते ४.२४ टक्क्यांपेक्षा कमी झाल्याचं आढळतं. या उलट रस्ते बांधणीवरील खर्च दीड वरून सहा टक्क्यांवर पोहोचला आहे. यावरून शासनाचे प्राधान्यक्रम लक्षात येतात. दीर्घकालीन विचार करता ही बाब अत्यंत चिंताजनक तर आहेच; परंतु जास्त धोकादायक ठरू शकते.

शिक्षण व्यवस्थेमधील शिक्षक हा महत्त्वाचा घटक होय. आवश्यक तेवढ्या प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता असेल तर शिक्षणास आवश्यक ती गतिशीलता प्राप्त होते; परंतु आज अपुऱ्या शिक्षकसंख्येमुळे शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शालेय स्तरावर आजही दहा लाखाच्या आसपास, माध्यमिक स्तरावर एक लाख २४ हजार, तर उच्च शिक्षण स्तरावर ६० टक्के शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. अशा स्थितीत आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांच्या पहिल्या ५०० संस्थांमध्ये आपण कुठे आहोत, हा प्रश्न विचारण्यात काय अर्थ. आंतरराष्ट्रीय पातळीवर शैक्षणिक संस्थांचे मानांकन ठरवत असताना शिक्षण संस्थांमधील प्राध्यापकांचं संशोधन आणि त्यांची गुणवत्ता/दर्जा पाहिला जातो. भारतात मुळात पूर्ण वेळ प्राध्यापकांची अपुरी संख्या, त्यात संशोधनाच्या अपुऱ्या सुविधा आणि आवश्यक त्या संशोधनास पूरक शैक्षणिक वातावरणाचा अभाव याचा परिणाम संशोधनावर पडतो. त्याबरोबरच परदेशी विद्यापीठं संशोधनावर फक्त भर देतात असं नाही तर त्यासाठी आवश्यक तो निधीही संशोधकांना उपलब्ध करून देतात. याउलट आपल्याकडे संशोधनावर ०.६९ टक्के एवढी (GDP) तरतूद केली जाते. त्यात नावीन्यपूर्ण, प्रायोगिक, मूलभूत संशोधन कसं पार पडणार?

विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नवनवीन संधी प्राप्त करून देण्यासाठी विविध अभ्यासक्रमांची रचना महत्त्वाची असते. अत्यंत व्यापक आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासक्रमांची मांडणी करावी लागते. भारतातील शिक्षण व्यवस्था आणि अभ्यासक्रम यांच्या मांडणीचा मूलाधार अर्थातच भारताच्या संविधानाच्या तत्त्वप्रणालीला असणार; परंतु त्याबरोबरच जागतिक पातळीवर जे जे नावीन्यपूर्ण आहे त्याचाही समावेश अभ्यासक्रमात असल्यास विद्यार्थ्यांना वैश्विक दृष्टीने विकसित होण्यास मदत होईल; परंतु आपल्याकडे तसं घडताना दिसत नाही. अलीकडे एका विशिष्ट विचारसरणीच्या तज्ज्ञ मंडळींचा अभ्यासक्रम रचनेत भरणा झालेला आढळतो. त्यामुळे अभ्यासक्रमांची रचना एकांगी होत आहे. इतिहासाचे एकांगी पुनर्लेखन, भारतीय ज्ञान परंपरा सांगत असताना वैज्ञानिक वस्तुनिष्ठतेकडे दुर्लक्ष, जागतिक ज्ञानपरंपरेच्या मांडणीस नकार असे अनेक प्रकार घडत आहेत. खरं तर अभ्यासक्रमांची निर्मिती वैचारिक संवादातून होत असते. त्यासाठी विविध विचारसरणीची मंडळी एकत्र येऊन चर्चा घडणं आणि त्यामधून सर्वंकष अभ्यासक्रमांची निर्मिती होणं निकोप शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक असतं.

भारताने २०१५ मध्ये शाश्वत विकास २०३०च्या कृती कार्यक्रमाच्या उद्दिष्ट ४ प्रमाणे सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समान गुणवत्तेचं शिक्षण आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या संधीस प्रोत्साहन देण्याचं धोरण स्वीकारलं आहे. ते साध्य करण्यासाठी तसेच सर्वसमावेशक शालेय शिक्षणाच्या संधी संविधानास अभिप्रेत असल्याप्रमाणे ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींना उपलब्ध करून देणं आणि आंतरराष्ट्रीय उच्च शिक्षण परंपरेत भारतीय विद्यापीठांचा सहभाग वाढविणं साध्य करण्यासाठी केवळ राजकीय बदलांना अनुसरून शैक्षणिक बदल न होता व्यापक वैश्विक शैक्षणिक दृष्टिकोन स्वीकारून शैक्षणिक उपक्रमांची योजना करणं आणि त्यासाठी आवश्यक भौतिक आणि सैद्धांतिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणं अत्यावश्यक ठरतं. त्यादृष्टीने काही महत्त्वाच्या मुद्द्यांकडे पुढे लक्ष वेधलं आहे.

**१. संविधानात दुरुस्ती -** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०ने नवीन शैक्षणिक संरचना स्वीकारली असून, त्यानुसार शालेय शिक्षणाचा वयोगट ३ ते १८ हा झाला आहे. याचा अर्थ असा की या वयोगटातील मुला-मुलींना मोफत व सक्तीचं शिक्षण देण्याची जबाबदारी केंद्राची (शासनाची), राज्याची असणार

आहे. या धोरणास कटिबद्ध होण्यासाठी संविधानाच्या मूलभूत अधिकारातील अनुच्छेद २१ क 'शिक्षणाचा हक्क' यात आणि तशाच अनुच्छेद ५१ क च्या 'ट' मध्ये दुरुस्ती करून सहा ते चौदा या वयोगटाऐवजी 'तीन ते अठरा' असा उल्लेख करावा.

**२. १०० टक्के पटनोंदणी आणि...** - शालेय शिक्षणाच्या प्रवेश स्तरावर १०० टक्के पटनोंदणी आणि गळतीचं प्रमाण कमी करणं हे दोन उद्देश साध्य करण्यासाठी, अ) राइट टू एज्युकेशन ॲक्ट २००९ प्रमाणे एक किलोमीटरच्या आत शाळा, हे धोरण अमलात आणणं आणि

ब) ३० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळा बंद न करणं, तथापि हे शक्य नसेल तर पायाभूत स्तर (३ ते ८ वयोगट) शाळा संकुल एक किलोमीटरच्या आत, पूर्वअध्ययन स्तर (८ ते ११ वयोगट) शाळा संकुल दोन किलोमीटरच्या आत आणि ११ ते १८ वयोगटासाठीचं शाळा संकुल तीन किलोमीटरच्या आत उपलब्ध करून दिलं जावं.

**३. शिक्षणाचे माध्यम -** शालेय ते उच्च शिक्षणातील शिक्षणाचं माध्यम मातृभाषा राहील; परंतु व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची मोबिलिटी पाहता तेथील शिक्षणाचं माध्यम इंग्रजी (जागतिक भाषा) असावं.

**४. शिक्षक भरती -**शालेय शिक्षणात विद्यार्थी-शिक्षक प्रमाण ३०:१, महाविद्यालयीन विद्यार्थी-शिक्षक प्रमाण ३०:१ तर विद्यापीठांमध्ये हे प्रमाण २०:१ लक्षात घेऊन रिक्त + नव्याने निर्माण होणाऱ्या जागांवर युद्ध पातळीवर शिक्षक नियुक्त केले जावेत.

**५. अभ्यासक्रम -**कोणताही पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन न बाळगता, वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यासक्रम निर्माण करण्यात यावा. भारतीय ज्ञान परंपरेवर भर देत असताना वैश्विक ज्ञान परंपरेचा तेवढाच आदर करून त्यांचा समावेश अभ्यासक्रमात केला जावा. वैज्ञानिक दृष्टिकोन, सुधारणावाद, मानवतावाद, शोधक बुद्धी यासह वैश्विक मानवी हक्कातील मूल्यांचं अधिष्ठान अभ्यासक्रमास मिळावं. याशिवाय अभ्यासक्रमात आवश्यक तेथे रोजगाराभिमुखतेचा संदर्भ राहावा.

**६. डिजिटलायझेशन -** माहिती आणि तंत्रज्ञानाच्या AIच्या युगात वावरत असताना शिक्षणात डिजिटलायझेशनवर भर राहणं स्वाभाविक आहे. तथापि, हे करत असताना डिजिटल शिक्षणाच्या मर्यादाही लक्षात घ्याव्या

लागतील. डिजिटलायझेशनचा अतिरेक होऊन फायद्यापेक्षा नुकसान जास्त होऊ नये याकरिता तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेऊन, अनेक देशांनी शिक्षणातील डिजिटल वापराचा जो पुनर्विचार सुरू केला आहे त्याच्या कारणांचा आढावा घेऊन एक पारंपरिक आणि डिजिटल शिक्षण यांचा सुसंवाद साधणारी नवीन शिक्षण व्यवस्था विकसित करण्यात यावी. तोपर्यंत डिजिटलायझेशनचा मन मानेल तसा वापर थांबवणं केव्हाही हितकारक ठरेल.

**७. संशोधन -** उउच्च शिक्षण संस्थांचा दर्जा त्या ठिकाणी सुरू असलेल्या दर्जेदार संशोधनावर ठरवला जातो. त्यादृष्टीने नीती आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे जीडीपीच्या किमान दोन टक्के आर्थिक निधी संशोधनासाठी उपलब्ध करून दिला पाहिजे. त्याबरोबर आंतरराष्ट्रीय शिक्षणात आपलं स्थान वरच्या पातळीवर निश्चित करण्यासाठी नीती आयोगाने केलेल्या शिफारशी अमलात आणाव्या लागतील.

**८. शिक्षणाचे विकेंद्रीकरण -** शिक्षण व्यवस्थेचं अतिकेंद्रीकरण हे केव्हाही धोकादायक. भारतात शिक्षण हा विषय समवर्ती सूचीत असल्याने केंद्र सरकार आणि राज्य सरकारं यांच्या संयुक्त समन्वयातून त्याचं संचालन होणं गरजेचं असतं. अलीकडच्या काळात हा समन्वय ढासळताना आढळतो. गुणवत्तेचं शिक्षण या नावाखाली 'एक देश, एक अभ्यासक्रम', 'एक देश - एक परीक्षा' अशा गोष्टी घडत आहेत. विविधतेने नटलेल्या या देशात 'सर्वत्र एक' हे तत्त्व सुसंगत ठरत नाही; कारण प्रत्येक भागाचा इतिहास, भूगोल, संस्कृती, अर्थकारण, समाजव्यवस्था, पर्यावरण, भाषा इत्यादी वेगवेगळ्या असून त्याच्या संदर्भातील शिक्षण ही त्या-त्या भागातील लोकांची गरज असते. त्यामुळे सर्वसाधारण शैक्षणिक चौकटीत राहून शैक्षणिक संस्थांना स्वातंत्र्य देणं योग्य ठरतं.

उच्च शिक्षणात कार्यरत असलेल्या विद्यापीठांची स्वायत्तता फक्त कायम ठेवणे महत्त्वाचे नसून त्यात आणखीन वाढ होणे शैक्षणिक विकासासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल. आज ही संकुचित होत असलेली स्वायत्तता ही चिंतेची बाब ठरत आहे.

**९. आर्थिक तरतूद -** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०ला अभिप्रेत असलेल्या शैक्षणिक धोरणाची तत्त्वं प्रत्यक्षात आणायची असतील तर त्यांनी फक्त सैद्धांतिक मांडणी करून चालणार नाही, तर ती प्रत्यक्षात येण्यासाठी

आवश्यक ती आर्थिक गुंतवणूकही महत्त्वाची ठरणार आहे. नीती आयोगाच्या अहवालानुसार २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकात शिक्षणावरील सार्वजनिक खर्च जीडीपीच्या तुलनेत ३.८ ते ४.२४ टक्के राहिला आहे. १९६४-६६ च्या शिक्षण आयोगाने शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या सहा टक्के असावा, अशी शिफारस केली होती. तीच शिफारस नंतरच्या सर्व आयोगांनी (त्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ही आहे) स्वीकारली आहे. खरं पाहता शिक्षणाचा वाढता व्याप, शिक्षण धोरणाने समोर ठेवलेली ध्येयं, विकसित भारत २०४७चा संकल्प, डॉ. के. कस्तुरीरंगन यांनी मांडलेलं आर्थिक गणित हे पाहता वास्तवाधारित विचार केल्यास, हे सर्व प्रत्यक्षात येण्यासाठी सार्वजनिक खर्चाची तरतूद जीडीपीच्या नऊ टक्क्यांपर्यंत ठेवावी लागेल.

**भालबा विभुते**

◆

## आली आली, गऽ लक्ष्मीमी

*भाद्रपद महिना प्रसन्नतेची शाल पांघरून येतो. पावसामुळे सृष्टी बहरलेली असते. धनधान्याची समृद्धी असते. अशा सुखद वातावरणात गणपतीसह गौरायांचं आगमन होतं. या गौराया लक्ष्मीच्या रूपात येतात, अशी भक्तांची श्रद्धा असते. एखाद्या शेतकरी स्त्रीला शेतात आलेलं पीक लक्ष्मीसमान भासतं आणि ती आनंदाने हरखून जाते. तिचा हा आनंद ती ओव्यांतून व्यक्त करते.* **इंदिरा संतांच्या 'मालनगाथा : २' या ललित गद्य/ पद्य संग्रहातील** *ओव्यांतून हा आनंद किती गोडव्याने प्रकटलाय पाहा-*

नांगर *नांगरऽ* — *जिमिनीचं केलं पानीऽऽ*
*चारी बईलं नंदीवानीऽ* — *नांगऱ्याची भर जानीऽऽ*
*लक्ष्मीमीबाई आलीऽ* — *पांघूरली घोंगरटऽऽ*
*धनीयाची माझ्याऽ* — *पाह्या तुमी नांगरटऽऽ*
*नांगरलं नांगरानंऽ* — *वखरानं वखरलंऽऽ*
*तिफनी बाईला तंऽ* — *शिनगारून नेलंऽऽ*
*बंधाऱ्याचं तासऽ* — *मेरोत्यावर गेलंऽऽ*
*बैलांच्या खुरीखाले* — *मातीचं सोनं झालंऽऽ*
*आली आली, गऽ लक्ष्मीमीऽ* — *या, गऽ, धूऱ्याच्या बंधाऱ्यानंऽऽ*
*अशी, सये, सळसळऽ* — *डोल दीला जुंधळ्यानंऽऽ*
*शेता, गऽ, शिवारात* — *जशी हळद लोटयीलीऽऽ*
*माझ्या, गऽ भरतारालाऽ* — *अशी लक्ष्मीमी भेटयीलीऽऽ*

(१) घोंगरट : कांबळे (२) वखर : नांगरलेली जमीन सपाट, सारखी करण्याचे अवजार (३) तास : पाभरी व फाळ (४) मेरोत्यावर : बाजूच्या– बांधाच्या बाजूच्या शेतजमिनीवर (५) *धुऱ्याच्या* : शेताच्या मुख्य हद्दीच्या

## पुस्तकाच्या पानांतून




# छाटितो गप्पा

**जी. बी. देशमुख**

पृष्ठे : १४४
किंमत : २५०

*मनाला साद घालणाऱ्या साध्या सोप्या घटना आणि वैदर्भीय भाषेचा गोडवा असणारा जी.बी.देशमुख यांचा अनोख्या गोष्टींचा संग्रह*

### थर्मास

आमच्या लहानपणी आमच्या वडिलांचं अमरावतीला हॉटेल होतं. १९५६ ते १९६२ अमरावतीच्या नगर वाचनालय संकुलात आणि नंतर १९६२ ते १९७१ पर्यंत बापट चौकातील आशा लॉजच्या गल्लीतील मार्केटमध्ये. दसरा - दिवाळीच्या पुजेला अथवा शहरात खरेदीचा (त्या काळी दुर्मिळ) असा योग आल्यास

आम्हा लहान मुलांना आमच्या दुकानात जायला मिळत असे. १५बाय१२ चा एक हॉल, त्याला ८बाय४ मापाचा व्हरांडा. व्हरांड्यात चहा-कॉफीच्या भट्ट्या आणि हॉलमधे चहाची तल्लफ लागलेले गिऱ्हाईक. त्या काळातल्या गोदरेजच्या फोल्डिंग खुर्च्या आणि वजनदार लाकडी टेबल. व्हरांड्याच्या एका टोकाला गल्ला अशी सजावट असायची. गल्ला म्हणजे पैशांचा ड्रॉवर असलेला टेबल आणि आमच्या बाबांची खुर्ची. टेबलाला ड्रॉवरच्या वर चिल्लर नाणं सरकण्यापुरती खाच. त्या काळी बापट चौकातील खासगी बस-स्टॅन्ड वरील गर्दी-गोंधळ, हॉटेलातील कामगारांची धावपळ आणि आम्हाला स्वादिष्ट खारीसोबत मिळणारा घट्ट दुधाचा चहा. सात-आठ वर्षांच्या वयातील ते चित्र मनात घट्ट रुतून बसलं आहे. कुठलीही आंतरसजावट नसलेली ती आटोपशीर जागा खूपच आपलीशी वाटायची. तिथे वडिलांच्या उपस्थितीमुळे आतून थोडे शेफारल्यासारखेही होऊन जायचे. दुकानाच्या बाहेर चहा घेऊन जायचा झाल्यास कामगार थर्मासचा वापर करत असत. तिथे तीन-चार लहान-मोठे थर्मास एका रांगेत ठेवलेले असत. आवश्यकतेप्रमाणे त्यांचा वापर होत असे. त्यातील काही थर्मासांवरील डिझाइनसुद्धा माझ्या चांगले लक्षात आहे. तांब्यात चहा न्यायच्या त्या काळात थर्मास ही एक आधुनिक व्यवस्था होती. १९७० मध्ये राज कपूरचा बिग बजेट 'मेरा नाम जोकर' सिनेमा येऊ घातला होता. एका ठरावीक मात्रेपेक्षा अधिक ब्रुक बाँड चहा खरेदी करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांना त्यांनी मोठ्या आकाराचे 'मेरा नाम जोकर' सिनेमाच्या जाहिरातीच प्रिंट असलेले थर्मास दिले होते. आम्ही दुकानात जात असू तेव्हा वडील आसपास असले की थर्मासला हात लावायची हिंमत होत नसे. जिथे बसलो आहे तिथून काळ्या पट्ट्याचा पांढरा कोट आणि हाती जोकरसारखा बाहुला घेतलेला राज कपूरचा निरागस चेहरा दिसत असे. त्या दृश्याच्या वर सर्कशीतील उंच झुल्यावर तंग जिमनॅस्ट सूटमधील गोऱ्या भराड रशियन हिरॉईन सोबत उभा असलेला ही-मॅन धर्मेंद्र दिसायचा. थर्मासच्या दुसऱ्या बाजूला काय आहे ते दिसत नसे. थर्मास चहाच्या भट्टीकडे असलेल्या ओट्यावर ठेवलेला असल्यामुळे तिकडे जायची परवानगी नव्हती. हातात घेऊन बघण्याची तर अजिबातच नव्हती. हातून निसटला तर काय... याची कल्पना न केलेलीच बरी. एखादा कामगार त्या थर्मासमध्ये चहा घेऊन निघाला की त्याचे हात आणि अंगाला भिडलेल्या भागात दडलेला सोडून थर्मासवरचं

उरलेलं काही बघायला मिळते का त्याची मनातल्या मनात धडपड चालायची. सिनेमा या विषयावर त्या वयातच ताजी माहिती ठेवायची हौस असलेल्या आम्हाला या सिनेमात खूप कलाकार आहेत, छान गाणी आहेत, सर्कस आहे, सिनेमा खूप मोठा आहे असे कळले होते. थर्मासवरील जाहिरातीवरून त्या कल्पना स्पष्ट होण्यास मदत मिळत होती आणि उत्कंठा वाढत होती. काही दिवसांनी हा सिनेमा रिलीज झाल्याचे कळले, तो खूप चालला नाही असेही कळले. प्राथमिक शाळेत असलेल्या आम्ही हा सिनेमा पाहण्याची कल्पनाही करण्याचा प्रश्नच नव्हता. मोठी माणसे म्हणायची 'राज कपूरचा सिनेमा आहे, लहान मुलांच्या कामाचा नाही.' नंतर काही वर्षांनी या वाक्याचा अर्थ कळला तेव्हा मोठे झाल्याचा पूर्ण फायदा उचलत राज कपूरचे सगळे सिनेमे मिटक्या मारत पाहिले होते. दुर्दैवाने राज कपूरचे हे ड्रीम प्रोजेक्ट अयशस्वी ठरले. त्याच सुमारास राज्य मार्ग परिवहनाचा प्रवासी वाहतुकीचा एकाधिकार आला आणि बापट चौकातील खासगी बस थांबा बंद पडला. पर्यायाने आमचे हॉटेल बंद पडले. काही दिवसांनी हॉटेलची जागा सोडावी लागली. हॉटेलातील टेबल-खुर्च्या, मोठमोठे स्टोव्ह सगळे काही घरी आले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे इतर थर्मासांसोबत 'मेरा नाम जोकर'चा तो थर्मासही घरी आला. एक दोन वर्ष सतत वापरला गेल्यामुळे त्याचा रंग फिका पडला होता, पण त्यावरील सगळे कलाकार ओळखू येत होते. तो थर्मास हाती घेऊन मी वारंवार त्यावरील दृश्याची पारायणं केली. राज कपूर, धर्मेंद्र, मनोजकुमार, राजेंद्रकुमार, सिम्मी गरेवाल, दारासिंग सगळ्यांचे चेहरे, सिनेमाच्या नावाच्या अक्षरांची कॅलिग्राफी, सगळे काही पाठ होऊन गेले होते. ते चित्र अभ्यासत बसण्याचा मला जणू छंदच लागला होता. त्या थर्मासला मी खूप जपायचो. दरम्यान कॉलेजला असताना पुन्हा 'मेरा नाम जोकर' लागला आणि यावेळी आम्ही पाहिला. हा थर्मास बघण्याचा छंद जडल्यापासून सुमारे बारा वर्षांनी सिनेमा पाहण्याचा योग आला आणि थर्मासवरील चित्र इतक्या दीर्घ प्रतीक्षेनंतर जिवंत होऊन उठलं. थर्मासवरील चित्र मनावर इतकं कोरलं गेलं होतं की हा सिनेमा आपण पहिल्यांदा बघत आहोत असं वाटलंच नाही.

जोकरच्या हसऱ्या चेहऱ्यामागील शोकांतिका दाखविणाऱ्या या सिनेमात राज कपूरला उंच झुल्यावरून उडी घेताना बघून प्रेक्षकात बसलेल्या त्याच्या आईचा श्वास वरच्या वर अडकून जातो तरी एका समर्पित कलाकाराच्या

निष्ठेने तो आईच्या मरणाचे दु:ख विसरून तिच्या कलेवरासमोरच शो पूर्ण करतो. त्या दु:खद प्रसंगी राज कपूरच्या तोंडून 'माँ...' शब्द फुटतो, त्या दु:खाचं वर्णन करवत नाही.

पुढे सुमारे वीस वर्षे तो थर्मास आमच्या कॉलनीतील मुलींची पहिली बाळंतपणं आणि सुनांची दुसऱ्या पासून पुढची अशी शेकडो बाळंतपणं 'तानाजी मालुसरे'च्या तोडीच्या बेभानपणाने एकट्याने आटोपत होता. नंतर त्याचा खालचा पत्रा गंजला. त्याचा वापर कमी झाला. त्याच्यावरील 'मेरा नाम जोकर'चे आता केवळ अवशेष शिल्लक होते, तरी कल्पनेतून मी वाचू शकत होतो. काही दिवसांनी तो थर्मास अडगळीच्या कोनाड्यात गेला. पण साफसफाई अथवा इतर कारणाने तो दिसला की बरे वाटत असे.

नंतर माझी अमरावतीहून नागपूरला बदली झाली. दोन वर्षांनी परत अमरावतीला आलो तर अडगळीचा कोनाडा साफ झालेला दिसला. काळजात चर्र झालं. बाळपणापासून पुढील तीस वर्षांची जोकरची साथ सुटली होती. आईच्या मरणाच्या दु:खद प्रसंगी राज कपूरच्या तोंडून 'माँ...' शब्द फुटतो तेव्हा जी कळ प्रेक्षकांच्या हृदयात उठली होती, तसंच काहीसं थर्मासरूपी जोकरच्या जाण्यामुळे माझं झालं होतं.

## गव्हातले खडे

सत्तरच्या दशकातील नगरपालिकेच्या शाळांमधील आम्ही विद्यार्थी होतो. शाळेची आकर्षक इमारत, स्वच्छ गणवेश, डेस्क-बेंच, तीन वेळा खायचा वेगवेगळ्या पदार्थांनी भरलेला टिफीन, आवारात कौतुक भरल्या नजरेनी आपल्या कोवळ्या मुलांना पाहणाऱ्या पालकांची अति उत्सुक गर्दी आणि त्यातील पुरुष पालकांचं आपलं पाल्य सोडून तितक्याच उत्सुकतेने इतर स्त्री-पालकांकडे बघण्याचं औत्सुक्य.... हे सगळं स्वप्नवत् दृश्य तेव्हा नव्हतं. गणवेशाची एकच जोडी असल्यामुळे वेळेवर जो हाती आला तो चोळामोळा अवस्थेतील सदरा अंगात टांगून, आधल्या दिवशीच्या खेळण्यातून सहीसलामत राहिली असल्यास चप्पल पायात सरकवून किंवा चपलीचं निरर्थक ओझं टाळून, काल शाळेतून आल्यावर ज्या अवस्थेत दप्तराची कापडी पिशवी फेकली होती त्याच अवस्थेत गळ्यात अडकवून धावत धावत शाळेत पोहोचावे. घरापासून तीनशे मीटरवरील भाड्याच्या खोलीत असलेल्या शाळेच्या वर्गातील जमिनीवर

अंथरलेल्या फारीवर मारकुटे मास्तर येण्यापूर्वी जाऊन बसलो की आमचं घोडं गंगेत न्हालं, अशी आमची शाळेतील गुड मॉर्निंग असे. पालकांचा शाळेत येण्याचा प्रश्न नव्हता, कारण शाळेत आम्हाला झोडपून काढण्याचा अधिकार गुरुजनांकडे होता, जो ते त्यांच्या शिकविण्याच्या अधिकारापेक्षाही अधिक कर्तव्य तत्परतेने पार पाडत. हीच जवाबदारी घरी आमचे तीर्थरूप गुरुजींपेक्षाही अधिक तत्परता आणि अनेक पटीत पार पाडत असत. त्यातील गमती आम्ही आजही मजेत एकमेकांना सांगत असतो. त्यामुळे, आजच्या संगणक युगातील शाळकरी मुलांच्या बापांच्या मिळमिळीत बापगिरीकडे पाहून ही मुले भविष्यात आपल्या तीर्थरूपांच्या कुठल्या गमती सांगतील, त्याविषयी आम्हास प्रश्न पडत असतो. ते असो. सगळ्या विषयांचे सर एकच असत. सरांनी जे पुस्तक काढायला लावलं ते काढायचं आणि सर जे सांगतील ते फारीवर रांगेत बसलेल्या इतर आमच्यासारख्याच अभ्यासाविषयी निरिच्छ मित्रांचे इंटेलिजंट उपद्रव झेलत भक्तिभावाने ग्रहण करायचं. त्यामध्ये एका लयीत सामुहिकरीत्या 'बे एक बे' असे पाढे म्हणणे, एका लयीत कविता म्हणणे अशा आवडत्या गोष्टीसुद्धा वर्गात घडायच्या. काही कविता विशिष्ट चालीत सर पाठ करवून घेत असत. हेल काढून पाढे म्हणणे खूपच मनोरंजक असे. नंतर त्याच लयीत मित्रांच्या नावाने शिव्या ओवल्या जायच्या, त्यामुळे पाढे पाठ होण्यास मदत होत असे.

शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत विषम अशा त्या वातावरणात देखील सरांनी विशिष्ट चालीत शिकविलेल्या काही कविता आजन्म लक्षात राहिल्या. त्यातीलच एक होती श्रावणबाळावरील कविता.

'शर आला तो धावुनी आला काळ
कळवळला श्रावणबाळ'

पांढरा पायजामा, शर्ट आणि गांधीटोपीतील मारकुटे सर ही कविता शिकवताना मात्र हळवे होऊन जात. तोपर्यंत रामायण आणि त्याच्याशी जुळलेल्या उपकथांचा परिचय नसूनही, श्रावणबाळाची मातृपितृभक्ती, कावडीत बसून तहानलेल्या अवस्थेत पाणी आणायला गेलेल्या श्रावणबाळाची प्रतीक्षा करणारे त्याचे अंध आई-वडील, आपला बाण हरणाऐवजी बालकाला लागला आहे हे पाहून खजील झालेला राजा दशरथ ही चरित्रं सरांच्या सांगण्यातून

व्यवस्थित समजत असत. शेवटी आपल्या बाळाचा मृत्यू झाल्याचे ऐकून गलितगात्र झालेले ते म्हातारे दशरथासाठी शापवाणी उच्चारतात, त्या क्षणी सरांना गलबलून येई. त्याच्या तोडीचा श्रवणानंद नंतरच्या आयुष्यात फार कमी वेळा आला असेल.

घरी आल्यावर अनेकदा मी आईला शाळेत त्या दिवशी झालेली कविता वाचून दाखवत असे. आमच्या आईचे शिक्षण सही करण्यापुरते झाले होते. शिक्षण आणि समजदारीचा, योग्यतेचा संबंध नसतो हे आईच्या उदाहरणातून मला फार आधी कळले होते. फार शिकलेली नसूनही तिच्यामध्ये अफाट प्रशासकीय आणि प्रबंधकीय क्षमता होत्या. मी तिला नेहमी म्हणायचो, 'तू जर शिकली असती तर नक्कीच खूप चांगली कलेक्टर झाली असती.' मला अभ्यासाला बसवायचं असलं की ती उगाचंच म्हणायची, 'अरे, आजची कविता वाचून दाखव.' कविता वाचण्यासाठी दप्तराला हात घातला की त्याच्या मागोमाग आपोआपच बाकीचा अभ्यास होऊन जात असे.

श्रावणबाळाची कविता शाळेत झाली त्या दिवशी मी घरी आलो तेव्हा आई गहू निवडत होती. त्या काळी आता मॉलमध्ये मिळतात तसे स्वच्छ केलेले गहू मिळत नव्हते. निवडणं-पाखडणं करून काळ्या मातीचे खडे आणि इतर काड्या वगैरे असा गव्हाच्या एका पोत्यात किलोभर कचरा नक्कीच निघत असे. गहू निवडत असताना दिसून पडलेले मातीचे खडे त्याच ताटात एका बाजूला गोळा करायचे, नंतर ताटातले स्वच्छ झालेले गहू एका भांड्यात टाकून पुन्हा नवीन गहू ताटात भरून घ्यायचे या क्रमात मातीचे खडे जमिनीवर पडू द्यायचे अशी ती निवडण्याची पद्धत होती. त्या खड्यांची चव अवर्णनीय होती. पहिला खडा तोंडात टाकला की पहिला पाऊस आल्यावर जसा मातीचा वास सुटतो तसा तोंडभर घमघमाट होत असे. दोनचार खडे तोंडात टाकल्याशिवाय मन भरत नसे. थेट शेतातल्या काळ्या मातीचे ते खडे चविष्ट लागत.

त्या दिवशी श्रावणबाळाची कविता ऐकविण्याची मलाच घाई सुटली होती. शाळेचे कपडे वगैरे न बदलवता सरळ आईच्या गव्हाच्या पसाऱ्यात बसून मी दप्तर उघडलं आणि आईला म्हटलं, 'तुला श्रावणबाळाची कविता वाचून दाखवतो.' आईने सुद्धा आधी हातपाय धुण्याची आडकाठी टाकली नाही. 'शर आला तो...' पासून सुरू झालो आणि मधे-मधे आईला अर्थ सांगत पुढे जात राहिलो. कविता अर्ध्यात जाईपर्यंत आईचे गहू निवडायचे

हात थांबले होते. शेवटी ‘तो जीव विहंग फडफडला, तनु पंजर सोडूनी गेला’ इथवर आलो आणि आई अचानक म्हणाली, ‘थांब, मी जरा समोर कोण आलं ते बघून येते.’ तिने गव्हाचे ताट पुढ्यात ठेवले आणि उठून पुढच्या खोलीकडे गेली. तेवढ्या वेळात एखादा गव्हाचा खडा तोंडात टाकावा म्हणून मी ताटाकडे हात केला.....ताटातील खड्यांच्या लहानग्या टेकडीवर हलकासा चिखल माझ्या हाताला लागला. आईच्या अश्रूंनी ताटातील काळ्या मातीचे खडे भिजले होते.

खडतर स्त्री जीवनातील चटके मूकपणे सहन करणाऱ्या त्या काळातील इतर वेळी कणखर वाटणाऱ्या स्त्रिया जराशा भावुक आवाहनाने अशा हेलावून जात असत.

समोर कुणी आलं नव्हतं हे माझ्या तेव्हाच लक्षात आलं.

## आनंदाची खूण

सहावी ते दहावी असं मणिबाई गुजराती हायस्कूल मधील पाच वर्षांचं वास्तव्य भावी जीवनाचा नितळ आरसा देऊन गेलं. मित्र, मजा, शाळकरी माहौल यासोबतच काही गुरुजनांची शिकविण्याची आनंददायी पद्धत, हे एक कारण. त्यातीलच एक होते भौतिकशास्त्र आणि गणितासारखे गनीम हसत खेळत ‘पहाड के नीचे’ आणणारे पिंपळगावकर सर. त्यांची शिकविण्याची जी मिश्कील पद्धत होती, ती मला खूप आवडायची. मस्त हलक्या शब्दकोट्या आणि विनोद करत गणित आणि भौतिकशास्त्रासारखे राक्षस ते हाताळायचे. आमच्यासारख्या गणिताच्या शत्रूंना कधी हलकी चापट मारायची झाल्यास सर दोन-तीन मिनिट बऱ्यापैकी गमतीत टॉर्चर करायचे. मला आठवते खडूने भरलेले हात गालावर चोपडत सर मला विचारत असत, ‘बाळ गजानन, तू थेट दुसऱ्या महायुद्धातून मणिबाईत आलास का रे? तुझ्या चेहऱ्यावर इतके व्रण आहेत की तू दुसऱ्या महायुद्धात खूप बहादुरी केली असेल, हे लक्षात येते. त्या भानगडीत गणित मात्र तू पार विसरून गेला...’ आणि मग खडू पावडरने भरलेला हात गालावर फिरायचा आणि अनपेक्षितपणे हलक्या हाताची चापटी बसायची. शिक्षेचा हा गमतीशीर प्रकार मी शाळेत खूप एंजॉय केला होता. ‘दुसरे महायुद्ध’ ही संज्ञाच मी सरांच्या तोंडून प्रथम ऐकली होती. आणि त्यामुळे पुढे दुसऱ्या महायुद्धाचे संदर्भ आले तेव्हा सर आपली कशी गंमत करत

होते ते आठवून माझं भरपूर मनोरंजन होत असे. एकूण त्यांची शिकवण्याची गमतीशीर पद्धत मनात नेहमीकरिता रुतून बसली. त्यांच्या तासांची मला नेहमीच उत्कंठा राहत असे.

नंतर मी विचार करू लागलो की सर म्हणतात तशा आपल्या चेहऱ्यावर इतक्या खुणा कशा तयार झाल्या? तोपर्यंत माझ्यासारख्या कधी केसांचा भांग करण्यापुरताही आरसा तोंडासमोर न धरणाऱ्या शाळकरी हुडदंगाच्या मनात अचानक आपल्याच चेहऱ्याविषयी उत्कंठा निर्माण झाली. एके दिवशी शाळा संपवून घरी गेल्यावर मी नेहमीच्या पद्धतीने दप्तर फेकलं आणि पिंपळगावकर सरांच्या निरीक्षणाची तड लावण्यासाठी आरसा तोंडासमोर धरला. पाच-सहा वर्षांचा असताना मला देवी (small pox) झाल्या होत्या, पण सुदैवाने चेहऱ्यावर त्यांचे एक-दोनच लहान व्रण शिल्लक होते. नंतर लक्षात आलं की कपाळावर डाव्या बाजूला एका ठळक खोकीचा व्रण, आणि डाव्या डोळ्याखाली, शत्रूघ्न सिन्हाच्या ओठाखालच्या खुणेसारखी एक खूण आहे. पण सर म्हणत होते तेवढं 'वावर' खराब झाल्याचं मला जाणवलं नाही. त्या दोन खुणांपैकी कपाळावरील मोठी खूण मी पाचवीत असतानाचा उपद्व्याप होता. झालं असं की अमरावतीत तेव्हा 'द ग्रेट रेमन सर्कस'चं आगमन झालं होतं. त्यापासून प्रेरणा घेऊन कॉलनीतीलच एका मित्राच्या घराच्या गच्चीवर आम्ही सर्कशीतील कवायत करू पाहत होतो. खऱ्या घोड्याऐवजी मित्राकडचा अडगळीतला लाकडी खबडक, खबडक घोडोबा आम्ही घेतला. त्यावर आमचा एक पाच-सहा वर्षांनी मोठा पण अकलेनी पन्नास-साठ वर्षे मागे असलेला थोराड मित्र बसला. पिरॅमिड बनवायचं म्हणून त्याच्या दोन खांद्यावर दोन जुळी भावंडं चढली आणि उंचीला मी सर्वांत कमी असल्यामुळे माझी निवड टॉप फ्लोअरसाठी झाली होती. गच्चीच्या धडीवर चढून मी जुळ्या भावंडांच्या खांद्यावर पाय ठेऊन उभा झालो. पिरॅमिड पूर्ण होताच आनंदाच्या भरात खालच्या थोराडाने घोडा हलवला. काही कळायच्या आत पिरॅमिड कोसळलं आणि थोड्याच वेळापूर्वी 'टॉप ऑफ द वर्ल्ड' स्थितीत असलेला मी थेट जमिनीवर आलो. कपाळाला खोक पडली. रक्ताने शर्ट माखला. तसाच एका हाताने जखम दाबत धावतच घरी पोहोचलो. आईने पहिले जखमेत हळद दाबली. तीर्थरूप घरी येण्यापूर्वी झोपून जायला सांगितलं. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात कसं मांडायचं याचे तिच्या मनात आडाखे सुरू होते. घरी

आल्या, आल्या सांगितलं तर माझं हिंसात्मक सांत्वन होण्याची शक्यता अधिक होती. गांधीवादी आईने सकाळपर्यंत वार्ता गुप्तच ठेवली. सकाळी उठल्यानंतर बाबांना सर्कशीचा खेळ सांगितला तेव्हा त्यांनी हसत, हसत डेटॉल लावून दिलं. काही दिवसांत जखम सुकली पण खूण शिल्लक राहिली. आजचा काळ असता तर स्कॅनिंग, एमआरआय, आयसीयू इ. धूमधाम झाली असती. हा झाला पहिल्या खुणेचा प्रसंग.

उजव्या डोळ्याखालील लहान पण गहरी खूण मात्र मला आयुष्यभर आनंद देत आली. चार भावंडात मी सगळ्यात धाकटा. मोठी बहीण माझ्यापेक्षा सात वर्षांनी मोठी. अलीकडेच तिचा सदुसष्टावा वाढदिवस झाला. मी आता साठचा. मी पहिलीत होतो तेव्हा ती सातवीत होती. तिला तेव्हापासूनच माझं भारी कौतुक, लाड. एके दिवशी ती शाळेतून आली, कपडे बदलले आणि तिच्या शाळेच्या गणवेशातील हिरवा स्कर्ट तिने मला कसातरी चढवला आणि मला म्हणाली, 'आता गोल, गोल फीर. मला स्कर्टचा घेर बघायचा आहे.' मी तसंच केलं. हा प्रकार आठ बाय सहाच्या स्वयंपाकघरात सुरू होता. तिने मला पुन्हा एकदा जोरात गोल गोल फिरायला सांगितलं आणि यावेळी चक्कर येऊन मी जो कोसळलो ते थेट बाजूलाच पाणी भरून ठेवलेल्या स्टील बकेटच्या दांडीच्या जोडावर. डोळ्याखालच्या जागेत बकेटची कडी खोचली गेली होती. मग काय रक्त, आरडाओरडा, पळापळ. आईने शांत डोक्याने जखमेत हळद दाबली आणि पुन्हा सकाळपर्यंत वर बातमी जाऊ दिली नाही. 'स्कर्टचा घेर पाहण्याच्या' नादात हे घडल्याचं दुसऱ्या दिवशी तीर्थरूपांना सांगितलं. डोळ्यावर सूज असल्यामुळे बाबा डॉक्टरकडे घेऊन गेले. डोळा सुरक्षित होता.

त्या घटनेनंतर पन्नास वर्षांपेक्षा अधिकचा काळ लोटला. आम्ही सगळे बाळपणातून बाहेर येऊन आपापल्या क्षेत्रात योगदान देऊन निवृत्तीला टेकलो. पण या घटनेतील व्रणाचं कौतुक आजन्म पुरून उरलं. अत्यंत धाडसी आणि जीवनात विविध प्रसंगात खंबीरपणे उभी राहिलेली आमची ताई, माझ्या कौतुकाची वेळ आली की अजूनही हळवी होते. स्कर्टचा घेर पाहण्याचा तो निरागस भाव अजूनही तिच्या डोळ्यांत उतरतो. आजीवन असं लहान राहण्यातला आनंद मिळणारे आपण खरे भाग्यवान, या तथ्याची आठवण मला डोळ्यांखालची खूण करून देत असते. असे 'हसते जख्म' आयुष्यातील ताण हलके करून देतात.

## पहिली हॅट्रिक

लहानपणी आमच्या घरी एक गैरसमज होता की मी एक हुशार मुलगा आहे. अमरावती नगरपालिकेच्या पाच नंबरच्या तेव्हा स्वत:ची इमारत नसलेल्या शाळेत आमचे प्राथमिक शिक्षण झाले. पहिलीचा वर्ग रुक्मिणी नगरात धांडेंच्या घरात, दुसरीचा मोडकांच्या वाड्यात नारायण नगरात, तिसरी जोगळेकर प्लॉट मधील राम निवासात आणि चौथी विजय कॉलनीतील सुखदेवराव तिडकेंच्या घरात. प्राथमिक शिक्षणातच इतकी विविधता अनुभवण्याचं भाग्य लाभलं की पूर्ण रुक्मिणी नगर परिसराचा अवघ्या नऊ वर्षांच्या वयात कोपरान्‌कोपरा माहीत झाला होता. पुढे पाचवीत सायन्स कोअर या थोर शाळेत प्रवेश घेतला. सायन्स कोअर या शब्दाचा अर्थ काय होत असेल, असा प्रश्न तेव्हा आम्हा हीन-दीन विद्यार्थ्यांचे असू द्या, तिथल्या बऱ्याचशा गुरुजनांनाही पडला नसावा. अर्थ तर राहोच, आजही त्या शब्दाचा उच्चार वऱ्हाडी शैलीत अमरावतीमध्ये ज्याला जसा जमला तसा होत असतो. तरी बहुमताने 'साएन्स्कोर' हा उच्चार अमरावतीत सर्वमान्य आहे. अर्थाचा अर्थाअर्थी संबंध नाही, कारण अर्थ न लागल्यामुळे सायन्स कोअरच्या मैदानाची भव्यता कमी होत नाही असं अमरावतीकरांचं ठाम मत आहे. तर सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे माझ्या हुशारीबाबतच्या घाऊक गैरसमजामुळे सहावीत माझी रवानगी त्यावेळी सायन्स कोअरची मुले ज्या शाळेला डालडाचा डब्बा म्हणून हिणवायची त्या त्यावेळच्या नावाजलेल्या मणिबाई गुजराती हायस्कूलमधे झाली. मोकाट सुटलेलं ढोर खुंट्याला बांधलं जावं अशी मणिबाईची शिस्त होती. सगळं ठीक होतं, पण मास्तर मारकुटेच फार होते. शिवाय सायन्सकोअर मध्ये येणारा माझा तिसरा क्रमांक तिथल्यापेक्षा जास्त मार्क्स मिळवूनही तिसाव्या क्रमांकावर गेला होता. भारतातला राष्ट्रीय रेकॉर्ड होल्डर खेळाडू जेव्हा ऑलिम्पिक्समध्ये धावतो तेव्हा जो परिणाम येतो हे तसंच होतं. 'खास'चे 'आम' होण्याचा हा मिडल-स्कूलचा अनुभव पुढे आयुष्यभर जमिनीशी जुळून राहण्याची शिकवण देऊन गेला. हृदयावरचे ओरखडे दुर्लक्षित करत जाण्याचं बाळकडू तिथून मिळालं, ते तरुण वयात खूप कामी पडलं. ते असो. सायन्स कोअरच्या तुलनेत थोडी शिष्ट वाटेल अशा या शाळेत हळूहळू रुळू लागलो. आपल्या सारखाच चेहऱ्यावरून सायन्सकोअरचा माजी विद्यार्थी वाटणाऱ्या, आमच्या घराकडेच राहणाऱ्या निशी काळे सारख्या स्मार्ट (!) मित्रांसोबत ओळख होऊ लागली.

एके दिवशी दुसरा तास सुरू होता. वर्गावर बहुतेक भगत सर होते. त्यांनी मला आणि निशीला खडू आणि काही वस्तू आणायला शाळेच्या कार्यालयाकडे पाठविले. तेवढीच पीरिअडमधून सुटका, अशा आनंदात आम्ही उड्या मारत गेलो आणि कार्यालयातून आवश्यक त्या वस्तू घेऊन परत निघालो. सगळे वर्ग सुरू होते. बाहेर शांतता होती. तेव्हा जिला नवीन बिल्डिंग म्हणायचे तिच्या पहिल्या मजल्यावर वर्ग होता. तो जिना बऱ्यापैकी प्रशस्त होता. तिथे पोहोचल्यासरशी निशी म्हणतो कसा, ‘गज्या, या जिन्यात आवाज बम घुमतो लेका.’ आणि तेव्हाच सुपरहिट बॉबी सॉंग ‘हम तुम इक कमरे में बंद हो और चाबी खो जाये....’ त्याने तारस्वरात गायला सुरुवात केलीसुद्धा. जिन्यात त्याचा आवाज मस्त घुमला. मग माझी पाळी. या शाळेतसुद्धा अशी मस्ती करता येते, ही माझ्यासाठी आनंदाची बातमी होती. निशीपेक्षा मोठ्या आवाजात मीसुद्धा ‘चाबी खो जाये’चा स्वर आळवला आणि जिन्याची इको क्वालिटी टेस्ट केली. तोपर्यंत आम्ही जिन्याच्या वरच्या टोकाला पोहोचलो होतो. समोर साक्षात अनगळ मॅडम उभ्या होत्या. कडक स्वभावाच्या या मॅडमना मी हसताना कधी पाहिलंच नव्हतं. गाणं गाताना मी रंगे हाथ (गळा) सापडलो होतो. ‘का रे, शाळेत अश्लील गाणी म्हणतोस? हात पुढे कर.’ गुपचूप उजवा हात पुढे केला. दोन वेळा सपऽसप असा आवाज झाला. उजव्या हाताच्या मुंग्या शांत होण्याच्या आत डावा हात पुढे केला. पुन्हा सपऽसप असा आवाज आला. दोन्ही हात चोळत ‘अश्लील’ म्हणजे काय यावर विचार करत वर्गात पोहोचलो.

मधल्या सुटीनंतर वर्ग होता गणिताचा. असाइन्मेन्टची वही घरून निघताना दप्तरात बसायचे विसरली हे सत्य सर डेस्कजवळ येईपर्यंत कळलंच नव्हतं. बडे बेआबरू होकर वर्गाच्या बाहेर रवानगी घेतली. बाहेर दोघे-तिघे समदु:खी बहादूर मित्र उभे होतेच. त्यांना पाहून दु:ख थोडे कमी झाले. थोडा रिलॅक्स होत नाही तोच समोरून त्याच खुँखार अनगळ मॅडम येताना दिसल्या. मेलो. आपले तोंड त्यांना दिसू नये यासाठी बराच प्रयत्न केला. पण त्या जिंकल्या. ‘आता काय केलंस?’ वर्गाबाहेरील मोकळ्या हवेत उभे असण्याचं कारण भीतभीतच सांगितलं. पुन्हा एकदा चार वेळा लाकडी पट्टीचे सपऽसप असे आवाज आधीपेक्षा अधिक तीव्रतेने उमटले. म्हटलं अजब शाळा आहे, आतला बाहेर काढतो, बाहेरची सपऽसप आवाज काढते.

शेवटच्या तासापर्यंत माझ्या बाबतीत सकाळपासून सगळ्या टीचर्सनी केलेली हिंसक कृत्ये डोक्यातून काढून मी त्यांना माफ केलं होतं. शेवटचा संगीताचा तास होता जुन्या बिल्डिंगमध्ये. सगळी मुलं रांगेत, शिस्तीत त्या वर्गापर्यंत मार्च करत निघालो. जुन्या बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यापर्यंत रांग पोहोचली होती. श्याम सेवक रांग सोडून समोरच्या कुणाची तरी खोड काढत होता. मी त्याच्या मागे होतो. आणि मला तिथून पंधरा फुटांवर एका वर्गाच्या पायरीवर अनगळ मॅडम दिसल्या. आमच्या गार्ड ऑफ ऑनरचं त्या निरीक्षण करत होत्या. माझे तळहात सकाळचे दोन प्रसंग आठवून कळवळले. सेवक डेंजर झोन मध्ये होता. मी त्याचा एक हात ओढून त्याला रांगेत खेचण्याचा प्रयत्न केला. तो आपल्याच धुंदीत होता. पुन्हा मी त्याला रांगेत खेचू लागलो, पण ते आतासारखंच वेंधळं होतं. तोपर्यंत आम्ही अनगळ मॅडमच्या पुढ्यात पोहोचलो होतो. मी तिरप्या नजरेने त्यांच्याकडे पाहत चालत होतो. तेवढ्यात त्यांनी आवाज दिलाच, 'ए, गजानन, तू इकडे ये.' सकाळच्या दोन भेटीत त्यांना माझे नाव पाठ झाले होते. 'काय रे सरळ चालता येत नाही का? त्याचा हात कशाला ओढत होतास. बराच बंड निघालास की रे तू! थांब तुझी तक्रार हेड-मास्तरांकडेच करते. चल, हात पुढे कर!' पुन्हा एका हातावर दोनच्या हिशेबाने चार सपऽसपचे ओळखीचे आवाज निघाले. एकाच टीचरकडून वर्गाबाहेर एकाच दिवशी अशा प्रकारची हॅट्ट्रिक करण्याचा अनोखं रेकॉर्ड आम्हा दोघांच्या म्हणजे मी आणि अनगळ मॅडमच्या नावे आहे. त्या कधीही आम्हाला शिकवायला नव्हत्या, नंतर असा प्रसंग त्यांचेतर्फे घडला नाही तरीही त्या नेहमीकरिता लक्षात राहिल्या. कारण प्रत्येक प्रसंगात धडा होता. चूक झाली की शिक्षा होते हे जिन्यात कळलं, शिक्षा झाली असली तरी दुसऱ्या कायद्याखाली पुन्हा होऊ शकते हे वर्गाबाहेरच्या प्रसंगात कळलं आणि कधी कधी चूक नसतानाही शिक्षा होऊ शकते, हे तिसऱ्या प्रसंगात कळलं. या प्रसंगांमुळे पुढे भारतीय वातावरणात जगणं सुकर झालं. 'चाबी खो जाये...' असं म्हणता, म्हणता पुढे मणिबाईच्या दिवसांत जीवनाची किल्ली गवसली.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




मराठ्यांचा इतिहास
खंड १
**।।शिवशाही।।**

**डॉ. जयसिंगराव पवार**

पृष्ठे : ४३६
किंमत : ७५०

शिवशाहीपूर्व काळापासून ते राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतरच्या कालखंडावर प्रकाश टाकणारा खंड

## १

## स्वराज्यापूर्वीचा काळोख

महाराष्ट्र शूरांचा देश. सह्याद्री-सातपुडा यांनी कणखर बनलेला देश. कृष्णा-गोदावरी यांनी पावन झालेला, पंढरपूर-तुळजापूर यांनी श्रद्धाळू बनलेला देश. ज्ञानोबा-तुकोबांच्या वाणीने न्हाऊन निघालेला देश.

अशा महान देशाचे मराठे शूर, काटक व कष्टाळू होते. त्यांच्या अंगी असणाऱ्या शौर्य, धाडस, प्रामाणिकपणा व

औदार्य, या गुणांचे सर्वत्र कौतुक होत होते. अगदी प्राचीन काळापासून मराठे या गुणांनी सर्वांच्या आदराचा विषय बनले होते. सातव्या शतकात हिंदुस्थानात आलेला चिनी प्रवासी युआन श्वांग मराठ्यांबद्दल गौरवाने लिहितो, 'मराठ्यांचे आचारविचार साधे व प्रामाणिक असतात. ते स्वाभिमानी व मितभाषी आहेत. उपकारकर्त्याशी कृतज्ञ व अपकारकर्त्याशी सुडाच्या भावनेने वागणारे आहेत. आपला अपमान धुऊन काढण्यासाठी ते प्राणाचीही पर्वा करत नाहीत. जर त्यांना आपल्या शत्रूचा सूड घ्यायचा असेल, तर ते त्याला अगोदर सावध राहण्याचा इशारा पाठवतात आणि नंतर प्रत्येक जण शस्त्रसज्ज होऊन शत्रूवर हल्ला करतो. जेव्हा शत्रू हल्ला करतो, तेव्हा ते पाठलाग करतात. तथापि, जेव्हा तो शरण येतो, तेव्हा ते त्यास जीवदान देतात.'

## महाराष्ट्रातील राजघराणी

महाराष्ट्रात प्राचीन काली चालुक्य, नलवडे, कदम, मोरे, शिलहार, अहीर, यादव इत्यादी अनेक राजघराण्यांची राज्ये होऊन गेली. ही राजघराणी म्हणजे आजच्या मराठ्यांचे प्राचीन काळातील पूर्वजच होत. त्यांनी पैठण, बदामी, मालखेड, कोल्हापूर, कल्याणी, देवगिरी, अशा अनेक ठिकाणी आपल्या राजधान्या स्थापन केल्या. राज्ये व साम्राज्ये स्थापन करून वाढविली. याच राजघराण्यांनी दक्षिणेत अनेक विद्या व कला यांना आश्रय देऊन मराठी संस्कृती वैभवशाली बनवली. कार्ला, भाजा, वेरूळ व अजंठा इत्यादी ठिकाणचे कलाकौशल्य आजही त्यांच्या वैभवाची, समृद्धीची व रसिकतेची साक्ष देत आहे.

प्राचीन हिंदुस्थानातील राज्यवैभवाची परंपरा चालवणारे देवगिरीचे यादव हे महाराष्ट्रातील शेवटचे बलाढ्य राजघराणे. दक्षिणेत हे घराणे १२व्या शतकात उदयास आले व लवकरच त्याचा अंमल सर्व महाराष्ट्रभर पसरला. याच सुमारास तेलंगणात काकतीय राजघराणे, कर्नाटकात होयसळ राजघराणे व अगदी खाली दक्षिणेत चोल व पांड्य राजघराणी या एतद्देशीय सत्ता उदयास आल्या होत्या. अशा प्रकारे सर्व दक्षिणभर हिंदू संस्कृती समृद्धीत होती; पण महाराष्ट्राला हे सुख व ही समृद्धी फार काल उपभोगण्यास मिळणार नव्हती. जागतिक धर्मकारणात व राजकारणात इस्लाम या नव्या शक्तीचा उदय झालेला होता आणि या शक्तीने हिंदुस्थानात घुसून उत्तरेकडील प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणले होते.

## ...आणि मराठे इस्लामी सत्तेचे गुलाम झाले!

दूर-दूर अरबस्तान या रानटी जमातींच्या देशात सातशे वर्षांपूर्वी मोहम्मद पैगंबरांनी इस्लाम धर्माची स्थापना केली होती. त्यांनी रानटी अरबांना केवळ धर्म व संस्कृतीच दिली असे नाही तर त्यांनी त्यांना राज्यसत्ता निर्माण करण्याची विद्याही शिकवली. पुढे एका हातात कुराण व दुसऱ्या हातात तलवार घेऊन इस्लामच्या अनुयायांनी पैगंबरांच्या मृत्यूनंतर अवघ्या शंभर वर्षांत स्पेनपासून सिंधपर्यंत राजसत्ता निर्माण केली. जगाच्या इतिहासातील हा एक चमत्कार होता! पण, या चमत्काराची बीजे मुस्लिमांच्या आक्रमक तत्त्वज्ञानात होती.

मुस्लीम आक्रमणाची पहिली लाट इ.स. ७१२मध्ये महंमद बिन कासीमच्या स्वारीने हिंदुस्थानावर कोसळली; पण येथे मुस्लीम राजवट फार काल स्थिर होऊ शकली नाही. हिंदुस्थानावर राजरोस स्वाऱ्या करण्याचे खरे कार्य ११व्या व १२व्या शतकात महंमद गझनी व महंमद घोरी या तुर्की आक्रमकांनी सुरू केले. त्यांनी लाखो हिंदूंचा संहार केला. शेकडो सुंदर व भव्य मंदिरे जमीनदोस्त केली आणि अगणित लूट मायदेशी नेली. त्यांच्याच स्वाऱ्यांनी सोन्याचा धूर निघणारी ही भूमी केवळ कंगालच नव्हे तर हतवीर्य बनत चालली. हिंदूंच्या संस्कृतीलाच नव्हे तर अस्मितेला इस्लामने जबर धक्का दिला होता व या धक्क्यातून ते सावरणे हे कठीण कार्य होते. दक्षिणेत जेव्हा देवगिरीच्या यादवांची राजसत्ता वैभवाच्या शिखरावर होती, तेव्हा उत्तर हिंदुस्थानचा ग्रास मुस्लीम सत्तेने घेतलेला होता आणि तिची प्रखर नजर यादवांच्या वैभवावरून भिरभिरत होती. 'हिंमत असेल त्यांनीच राज्य करावे' या राजनीतीस अनुसरून या मुस्लीम सत्तेला दक्षिणेतील हिंदू सत्ता नष्ट करून आपले आसन निर्माण करायचे होते. फक्त तिला निधड्या छातीचा कल्पक नेता हवा होता व तो अल्लाउद्दीन खिलजीच्या रूपाने तिला मिळाला.

इ.स. १२९४ मध्ये अल्लाउद्दीनने यादवांवर पहिली स्वारी करून मुस्लीम सत्तेचे पहिले पाऊल दक्षिणेत टाकले आणि त्यानंतरच्या अवघ्या पंचवीस वर्षांत पत्त्याचे बंगले कोसळावेत त्याप्रमाणे त्या सत्तेच्या रेट्यापुढे दक्षिणेतील समस्त हिंदू सत्ता धडाधड कोसळल्या. इ.स. १३१७ साली अल्लाउद्दीनपुत्र मुबारक खिलजी याने देवगिरीच्या यादवांचे राज्य कायमचे नष्ट करून टाकले आणि महाराष्ट्राचा स्वातंत्र्यसूर्य लयाला गेला. महाराष्ट्र दिल्लीच्या सुलतानी अमलाखाली आणला गेला. पुढे खिलजी घराण्याची

दिल्लीतील सत्ता लवकरच संपुष्टात येऊन त्या ठिकाणी तुघलक घराण्याची सत्ता निर्माण झाली. तेव्हा महाराष्ट्रावर तुघलकांची सत्ता स्थापन झाली. इतिहासप्रसिद्ध महंमद तुघलक याच घराण्यातील होय. त्यानेच दिल्लीची राजधानी देवगिरीस आणली व तिचे नाव 'दौलताबाद' असे ठेवले. दक्षिणेतील हिंदूंचा विरोध त्याने क्रूरपणे मोडून काढला. वरंगलचे हिंदू राज्य त्यानेच नष्ट केले. महंमद दिल्लीकडे परतल्यावर मागे, हसन ऊर्फ जाफरखान या दौलताबादेच्या त्याच्या सुभेदाराने त्याच्याविरुद्ध बंड पुकारले व त्याने आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली – (इ.स. १३४७). हा हसन पुढे हसन गंगू बहामनी या नावाने प्रसिद्धी पावला व त्याचे राज्य 'बहामनी राज्य' म्हणून ओळखले जाऊ लागले. म्हणजे आता महाराष्ट्रावर दिल्लीच्या तुघलक सुलतानांची सत्ता नष्ट झाली व तिच्या जागी दौलताबादेच्या बहामनी सुलतानांची सत्ता प्रस्थापित झाली. मालक बदलले; पण गुलाम तेच राहिले. या बहामनी राजघराण्याचा शेवट इ.स. १५२६ मध्ये झाला आणि त्या सत्तेच्या अस्तातून दक्षिणेत आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, इमादशाही व बरीदशाही अशा पाच मुस्लीम शाह्या म्हणजे सत्ता निर्माण झाल्या. या शाह्या आपापसात संघर्ष करीत राहिल्या तरी हिंदूंना दडपून टाकण्याचा त्यांचा कार्यक्रम एकसारखाच होता व तो जोमाने चालूच राहिला.

## विजयनगरचा तेजस्वी प्रतिकार

देवगिरीच्या हिंदू सत्तेचा ग्रास घेऊन मुस्लीम सत्ता विजयोन्मादाने पुढे धावत असता तिला थोपविण्याचे ऐतिहासिक कार्य तुंगभद्रेच्या किनाऱ्यावर उदयास आलेल्या विजयनगरच्या हिंदू सत्तेने केले. महंमद तुघलक दक्षिणेत असता त्याने तुंगभद्रेच्या खोऱ्यातील कंपाली हे हिंदू राज्य जिंकून घेतले व हजारो स्त्री-पुरुषांना गुलाम करून उत्तरेत नेले. या गुलाम लोकांत हरिहर व बुक्क हे बंधू होते. एके काळी ते कंपाली राज्यात मंत्री होते; पण आता त्यांच्यावर गुलाम बनण्याची पाळी आली होती. त्यांचे दुर्दैव येथेच थांबले नाही. महंमदाने त्यांना इस्लाम धर्माची दीक्षा दिली; परंतु हिंदू धर्म व हिंदू समाज यांचे रक्षण करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा या धर्मांतराने मावळली नव्हती. त्यांच्या हृदयात सुडाचा अंगार फुलतच राहिला.

लवकरच दक्षिणेतील कंपाली व वरंगल येथील हिंदूंनी पुन्हा सुलतानाविरुद्ध

बंडे करून त्याच्या सुभेदारांना पळवून लावले. तेव्हा आता महंमदाने या बंधूंना मोठी फौज देऊन दक्षिणेत ती बंडे मोडण्यास पाठविले. हरिहर व बुक्क हे सुलतानाचे सैन्य घेऊन कंपालीच्या प्रदेशात आले. याच वेळी शृंगेरीच्या मठाचे शंकराचार्य श्रीमाधवाचार्य विद्यारण्य स्वामी पुढे सरसावले. त्यांनी उभय बंधूंना दिल्लीच्या सुलतानाचे वर्चस्व झुगारून हिंदू धर्म व संस्कृती यांच्या रक्षणासाठी नव्या राज्याची स्थापना करण्याचे आवाहन केले. एवढेच नव्हे, तर स्वामींनी त्यांना शुद्ध करून हिंदू धर्मात घेतले व त्यांच्या कार्यास आशीर्वाद दिला. स्वामींच्या प्रेरणेने या दोघा बंधूंनी तुंगभद्रा नदीच्या तीरावर नव्या हिंदू राज्याची स्थापना केली. इ.स. १३३६ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला.

लवकरच या राज्याचे सामर्थ्य व वैभव वाढत जाऊन त्याचे रूपांतर 'विजयनगरच्या साम्राज्यात' झाले. या साम्राज्यसत्तेने पुढे दोनशे वर्षे दक्षिणेतील मुस्लीम सत्ताधीशांशी मुकाबला करून त्यांचे आक्रमण थोपवून धरले व आपल्या धर्माचे व संस्कृतीचे रक्षण केले.

## विजयनगरचा पाडाव

परंतु, दुर्दैवाने हिंदूंचा हा तेजस्वी प्रयत्न शेवटी अपेशी ठरला. आपापसात भांडणाऱ्या दक्षिणेतील पाचही शाह्या हिंदूंची ही सत्ता मोडून काढण्यासाठी एक झाल्या. तालिकोटच्या रणमैदानावर या पाच शाह्यांनी विजयनगरच्या सत्तेचा पूर्ण पराभव केला (इ.स. १५६५). विजयनगरचा शेवटचा सम्राट रामराजा मारला गेला. रणमैदानाहून इस्लामी फौजा विजयनगरकडे धावल्या आणि ते सुंदर व वैभवशाली नगर त्यांनी संपूर्ण उद्ध्वस्त करून टाकले. विजयनगरचे साम्राज्य म्हणजे हिंदूंचे वैभव. हिंदूंच्या संस्कृतीचे तेजस्वी केंद्र. दक्षिणेतील समस्त हिंदूंचे ते आशास्थान. असे वैभवशाली नगर मुसलमानांनी बेचिराख करून टाकले. स्त्री-पुरुषांची सरसहा कत्तल करण्यात आली. भव्य इमारती व सुंदर मंदिरे उद्ध्वस्त करण्यात आली. करोडो रुपयांची संपत्ती लुटण्यात आली. सेवेल हा इतिहासकार म्हणतो की, यापूर्वी जगाच्या इतिहासात अशा वैभवशाली शहराचा इतक्या अल्पावधीतच असा भयंकर विध्वंस केव्हाही झाला नव्हता.

विजयनगर किती सधन व श्रीमंत होते, याचे एकच उदाहरण पाहण्यासारखे आहे. सन १४०६ मध्ये विजयनगरच्या राजकन्येचा विवाहसोहळा भव्य प्रमाणावर साजरा केला गेला होता, तेव्हा राजधानीतील सहा मैल लांबीच्या

रस्त्यावर भरजरी गालिचे पसरलेले होते! विजयनगरचे लष्करी सामर्थ्यही प्रचंड होते. कृष्णराय या राजाच्या कारकिर्दीत त्या राज्याजवळ सात लाख पायदळ, बावीस हजार घोडदळ व साडेपाचशे हत्ती होते! अशा वैभवशाली हिंदू सत्तेचा नाश हा दक्षिणेतील हिंदूंच्या स्मरणातून नाहीसा होणारा नव्हता. संधी मिळताच पुन्हा आपल्या सत्तेचे पुनरुज्जीवन करण्याची हिंदूंची महत्त्वाकांक्षा या स्मरणामुळे जिवंत राहिली होती.

## दक्षिणेच्या राजकारणात मोगली सत्तेचा प्रवेश

दक्षिणेतील बहामनी राज्याचा अस्त झाला. त्याच वेळी उत्तरेत एक अत्यंत महत्त्वाची घटना घडली. ही घटना म्हणजे दिल्लीवर राज्य करीत असलेल्या इब्राहिम लोदी या सुलतानाचा पराभव करून तेथे बाबरने मोगल बादशाहीची मुहूर्तमेढ रोवली– (इ.स. १५२६). बाबर हा मध्य आशियातील फरघान या छोट्या राज्याचा राजा होता. विलक्षण महत्त्वाकांक्षेपोटी हिंदुस्थानवर स्वारी करून एका महान राजघराण्याची स्थापना त्याने येथे केली होती. येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, बाबरपासून औरंगजेबापर्यंतच्या सर्व मोगल बादशहांपुढे सर्व हिंदुस्थान आपल्या वर्चस्वाखाली आणण्याची एक महत्त्वाकांक्षी योजना होती. त्यानुसार अकबराच्या कारकिर्दीत काबूलपासून बंगालपर्यंतचा व काश्मीरपासून भीमा नदीपर्यंतचा हिंदुस्थान जिंकला गेला. त्याच्याच कालात खानदेशातील सुलतानाशी व अहमदनगरच्या चांदबिबीशी लढून दक्षिणेतील खानदेश, वऱ्हाड व अहमदनगर हे प्रदेश जिंकण्यात आले. हे प्रदेश आता मोगली सुभे होऊन त्यावर आता 'दक्षिणेचा सुभेदार' मोगलांकडून नेमला जाऊ लागला.

निजामशाहीचा बराच मुलूख मोगलांनी काबीज केला तरीही निजामशाही बुडली नव्हती. निजामशाहीचा वजीर मलिक अंबरने जहांगीरच्या कारकिर्दीत मोगलांशी संघर्ष चालू ठेवून तिचे संरक्षण केले. पुढे मलिक अंबरच्या मृत्यूनंतर शहाजहानने इ.स. १६३३मध्ये निजामशाही गिळंकृत केली. यानंतर शहाजी राजे भोसले यांनी तिला पुनरुज्जीवित करून मोगलांशी लढा दिला. खुद्द शहाजहान दक्षिणेतील या मोहिमेचे नेतृत्व करीत होता. लवकरच गोवळकोंड्याची कुतुबशाही व विजापूरची आदिलशाही या दोन शाह्या त्याला शरण गेल्या व त्या मोगलांच्या मांडलिक बनल्या. शहाजी राजांवरील स्वारीत आता आदिलशहाने मोगलांशी हातमिळवणी केली. अखेरीस मोगल

व आदिलशहा यांच्या संयुक्त फौजांपुढे शहाजीराजांना हार खावी लागली आणि त्यांनी निर्माण केलेली निजामशाही समाप्त झाली– (इ.स. १६३६). शहाजहान लगेच दिल्लीला रवाना झाला व त्याचा पुत्र औरंगजेब याची आता दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. या सुभेदाराच्या अमलाखाली दक्षिणेतील खानदेश, वऱ्हाड, तेलंगण व दौलताबाद असे चार प्रांत मोडत होते.

## दक्षिणेतील आणखी दोन सत्ता

पश्चिम किनाऱ्यावर आपले सागरी वर्चस्व निर्माण करणाऱ्या सिद्दी व पोर्तुगीज या दक्षिणेतील आणखी दोन सत्ता होत्या. मराठ्यांच्या शत्रूंच्या यादीत या दोन शत्रूंची भर पडलेली होती. मोगल व दक्षिणेतील सुलतान मराठ्यांना भूमीवर अजिंक्य ठरले होते, तर सिद्दी व पोर्तुगीज हे त्यांना सागरावर अजिंक्य ठरले होते.

सिद्दी ही मूळची पूर्व आफ्रिकेतील ॲबेसिनिया या देशातील मुस्लीम जमात होय. अरबी समुद्रात त्यांनी आपली आरमारी सत्ता निर्माण केली होती. मुंबईच्या दक्षिणेला ४५ मैलांवर समुद्रात असणारा जंजिरा किल्ला व राजापूरच्या खाडीवर असणारी दंड– राजापुरी ही ठिकाणे हे त्यांचे पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेश होते. प्रारंभी सिद्दी निजामशाहीच्या चाकरीत होते. निजामशाहीच्या नाशानंतर मोगल-अदिलशहा यांच्या इ.स. १६३६च्या तहानुसार त्यांचा प्रदेश आदिलशहाच्या वाटणीस आला. तथापि, सिद्दीने आदिलशहाचे स्वामित्व लगेच स्वीकारले नाही. आदिलशाही फौजांना त्यांच्याशी बरेच दिवस लढावे लागले. शेवटी आदिलशहा व सिद्दी यांच्यात तह होऊन सिद्दी, आदिलशहाचे सरदार बनले. त्यांच्या प्रदेशांशिवाय नागोठण्यापासून बाणकोटपर्यंतचा प्रदेश आदिलशहाने सिद्दीला देऊन टाकला. त्याच्या मोबदल्यात सिद्दीने आदिलशहाच्या व्यापाराचे व मक्केच्या यात्रेकरूंचे संरक्षण करण्याचे कबूल केले. तेव्हा पश्चिम किनाऱ्यावरील ही सिद्दींची सत्ता पोर्तुगीजांप्रमाणेच मराठा स्वातंत्र्याच्या मार्गात उभी राहिलेली होती. दुसरी पोर्तुगीजांची सत्ता ही व्यापारी व राजकीय अशा दुहेरी स्वरूपाची होती. आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर समुद्र मार्गाने येणारे पहिले युरोपियन पोर्तुगीजच होत. युरोपात पंधराव्या-सोळाव्या शतकात जे बौद्धिक युग सुरू झाले होते, त्याचे पोर्तुगीज, स्पॅनिश,

डच, फ्रेंच, इंग्रज व्यापारी हे प्रतिनिधी होते. बौद्धिक युगाने युरोपात अनेक विचारवंत, लेखक, संशोधक, धाडसी खलाशी, व्यापारी निर्माण केले. एक नवी संस्कृतीच निर्माण केली. या नव्या संस्कृतीने जे राजकीय व लष्करी सामर्थ्य युरोपियनांच्या ठिकाणी निर्माण केले, त्याच्या बळावर पुढे त्यांनी १८व्या व १९व्या शतकात सर्व जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

अशा या युरोपियनांपैकी हिंदुस्थानच्या भूमीवर प्रथम पाय ठेवणारा युरोपियन म्हणजे वास्को-द-गामा हा होय– (१४९७). त्याच्या या धाडसामुळे हिंदुस्थानकडे समुद्रावरून जाणारा मार्ग युरोपियनांना सापडला होता. केवळ हिंदुस्थानच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारी ही घटना होती. पोर्तुगीजांमागून त्याच मार्गाने डच, इंग्रज, फ्रेंच हिंदुस्थानाकडे आले व त्यांनी सतराव्या शतकात वखारी थाटावयास सुरुवात केली. त्यांनी हिंदुस्थानातील व्यापारी सामर्थ्याबरोबर राजकीय सामर्थ्य पैदा केले. इ.स. १५१०मध्येच पोर्तुगीजांनी आदिलशाहीकडून गोवा जिंकून घेतले होते. पुढे इ.स. १५४३मध्ये खुद्द आदिलशहानेच त्यांना साष्टी व बारदेश हे गोव्यालगतचे प्रांत बक्षीस म्हणून दिले. यापूर्वीच इ.स. १५३४मध्ये गुजरातच्या सुलतानाकडून त्यांना वसई प्रांत मिळाला होता. अशा प्रकारे सोळाव्या शतकाच्या शेवटी पोर्तुगीजांच्या राज्यात दीव, दमण, मुंबई, वसई, चौल, गोवा, साष्टी हे महाराष्ट्राला जवळ असणारे प्रदेश मोडत होते. पोर्तुगीज केवळ व्यापारावर समाधानी नसल्याने त्यांनी राज्यवृद्धी व धर्मप्रसार हे उद्योग केले. स्वाभाविकच दक्षिणेमधील आदिलशाही, मोगल व मराठे यांच्याशी त्यांचे राजकीय व लष्करी संघर्ष घडून आले.

## सुलतानी अत्याचार

दिल्लीचे सुलतान, बहामनी सुलतान अथवा काही अपवाद वगळता त्यानंतरचे आदिलशाही व निजामशाहीचे सुलतान, या सर्वांचेच धोरण आक्रमक, असहिष्णू व हिंसक होते. त्यांनीच दक्षिणेतील हिंदूंच्या भव्य मंदिरांचा, उत्कृष्ट कलाकृतींचा व वैभवशाली नगरांचा नाश केला. लाखो हिंदूंना काफीर म्हणून ठार केले. लाखोंना बाटवून भ्रष्ट केले. त्या काळच्या कागदपत्रांत या अत्याचारांची अनेक उदाहरणे आढळतात. सारांश, रामदास स्वामींनी म्हटल्याप्रमाणे– 'म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुता दिवसाचे माजले बंड ।' अशी दक्षिणेची, विशेषतः महाराष्ट्राची अवस्था झाली होती.

तीर्थस्थानांवरील व मंदिरांवरील अत्याचार तर त्या-त्या ठिकाणची भग्न मंदिरे व नाक, हात तोडून विद्रूप केलेल्या मूर्तीच सांगतील. तत्कालीन सरकारी कागदपत्रांत हिंदूंच्या मूर्ती फोडणे हे काझीचे एक प्रमुख काम म्हणून सांगितले आहे. पुणे जिल्ह्यात घोडे या गावी एक शिलालेख सापडला आहे. त्यात असे म्हटले आहे की, वीर मुहम्मद इमान या मुसलमान अधिकाऱ्याने हिंदूंची ३३ मंदिरे नष्ट केली आणि तिथे मशीद बांधली; आणि त्याने हे सर्व 'परमेश्वराच्या कृपेसाठी' म्हणून केले!

शिवजन्मापूर्वीच्या सततच्या तीनशे वर्षांच्या मुस्लीम राजवटीखाली महाराष्ट्रात एक धर्मांतरित मुसलमानांचा वर्ग तयार झाला होता. सरकार मुसलमान व बहुसंख्य प्रजा हिंदू यामुळे सरकारला प्रजेबद्दल व प्रजेला सरकारबद्दल आस्था वाटण्याचे कारण नव्हते. अशा परिस्थितीत या धर्मांतरित मुसलमानांवर सरकारची मेहरनजर असे. त्यांचे गुन्हे दडपले जात किंवा माफ केले जात. कऱ्हाडजवळच्या मसूर गावच्या मुजावरने त्याच गावच्या जगदाळे-पाटलांच्या कुटुंबातील दोन जणांचे खून केले. हे प्रकरण पुढे पैठणच्या ब्राह्मण सभेपुढे गेल्यावर त्यांनी जो निकाल दिला आहे त्याच्या शेवटी त्यांनी मुजावरासंबंधी म्हटले आहे, '(तू) वतनास विक्षेप केला, ऐसा तू गुन्हेगार. तुज देहांत प्रायश्चित्त द्यावे; परंतु मुसलमानांची पादशाही आणि तूही मुसलमान. याकरिता क्षमा केली.' तेव्हा अशा परिस्थितीत मुसलमानांची शिरजोरी अधिक वाढल्यास नवल नव्हते.

## ...आणि अस्मानी कोप

महाराष्ट्रातील प्रजा केवळ सुलतानी अन्यायाखालीच भरडली जात होती असे नाही, तर निसर्गही त्यांची अनेक प्रकारे ससेहोलपट करीत होता. पावसाचा लहरीपणा शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त करून जाई. कोकणात पाऊस हत्तीच्या सोंडेने बरसतो, तोच पाऊस सह्याद्री चढून देशावर येताच कंजूष माणसासारखा अतिव्यवहारी होतो. त्या कालातही वरुण राजाचा स्वभाव तसाच होता. त्यामुळे त्याने एखादे साल तोंडच दाखविले नाही तर सर्व महाराष्ट्रात हाहाकार माजत असे.

शिवजन्माच्या सुमारास इ.स. १६२९-३०मध्ये दक्षिणेत असाच भयानक दुष्काळ पडला होता. सतत दोन वर्षे पाऊस न झाल्याने लोक हैराण झाले होते. आपल्या 'History of India' या ग्रंथामध्ये या दुष्काळाचे

वर्णन करताना एल्फिन्स्टन हा इतिहासकार म्हणतो :‘या दुष्काळामुळे हजारो लोकांनी आपली घरेदारे सोडली आणि त्यापैकी अनेक जण सुबत्तेच्या ठिकाणी पोहोचण्यापूर्वीच मृत्युमुखी पडले. अनेक जण घरीदारीच उपासमारीने मरण पावले. काही प्रांतच्या प्रांत निर्मनुष्य झाले. त्यापैकी अनेक प्रांत ४० वर्षांनंतरही आपली घडी बसवू शकले नाहीत. दुष्काळामुळे जनावरांना चारा मिळाला नाही, त्यामुळे सर्व जनावरे नष्ट झाली. दु:खात भर म्हणून की काय त्यातच रोगांच्या साथी सुरू झाल्या.’

याहीपेक्षा हृदयद्रावक वर्णन ‘बादशहानामा’ या ग्रंथाचा लेखक अहमद लाहोरी याने केले आहे. तो म्हणतो : ‘माणसे माणसास खाऊ लागली व बापाची आपल्या मुलावरील माया कमी होऊन त्याच्या मांसावर नजर जाऊ लागली.’ अशा परिस्थितीत मोगल व निजामशहा यांच्या फौजा उत्तर महाराष्ट्रात धामधूम करीत होत्या. निजामशाहीचा जीवन-मरणाचा लढा चालू होता. अशा स्थितीत लोकांच्या पदरी मरणाशिवाय काय पडणार होते?

ज्वारी, बाजरी, वरी, नाचणी, भात ही पिके पिकविणाऱ्या महाराष्ट्राच्या या डोंगराळ भागात उत्तरेसारखी आर्थिक सुबत्ता कशी नांदणार? मुख्य व्यवसाय शेतीचा असला तरी शेतीवर अवलंबून असणारे सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम यांसारखे छोटे-छोटे व्यवसाय करणारे वर्ग सर्व खेड्यांतच होते; परंतु हे व्यवसाय नावलौकिक किंवा मानमरातब मिळवून देणारे नव्हते. म्हणूनच ज्याच्याजवळ घराण्याची प्रतिष्ठा, पराक्रम व धाडस असे, असा धाडसी मराठा स्वत:ची छोटी फौज तयार करे आणि आपला भाग्योदय निजामशहा अथवा आदिलशहा यांच्या दरबारात होतो का, हे पाहण्याच्या खटपटीस लागे.

## दक्षिणेतील शाह्यांच्या दरबारातील मराठे

बहामनी राज्याच्या विनाशातून दक्षिणेत पाच शाह्यांची निर्मिती झाली होती हे आपण पाहिले. या शाह्या कधी आपापसात तर कधी विजयनगरच्या राज्याशी सतत संघर्ष करत राहिल्या. तालिकोटच्या लढाईनंतर त्यांचा समान शत्रू नाहीसा झाला. परिणामी, त्यांच्या आपसातील लढायांना पुन्हा जोर चढला. जिंकून घेतलेल्या विजयनगरच्या प्रदेशात त्यांना आपला स्थिर अंमल निर्माण करता आला नाही. स्वाभाविकच विजयनगरच्या अनेक माजी सुभेदारांनी कर्नाटकात आपापली अनेक छोटी राज्ये निर्माण केली. हेच सुभेदार पुढे कर्नाटकातील ‘नायक’ म्हणून प्रसिद्धीस आले.

मराठी सत्तेच्या उदयाच्या वेळी दक्षिणेतील या पाच शाह्यांपैकी आदिलशाही, निजामशाही व कुतुबशाही या तीनच शाह्या अस्तित्वात राहिल्या होत्या. निजामशाहीने इमादशाही नष्ट केली होती, तर आदिलशाहीने बरीदशाही गिळंकृत केली होती. आता उरलेल्या तीन शाह्यांना उत्तरेतून दक्षिणेत घुसणाऱ्या मोगली सत्तेशी सामना द्यावयाचा होता. मोगली सत्तेचे सामर्थ्य प्रचंड होते. तिच्या रेट्यापुढे आपण टिकू शकणार नाही अशी भीती या शाह्यांना वाटत होती. महाराष्ट्रातील मराठ्यांचा निजामशाही व आदिलशाही या दोन शाह्यांशीच अधिक जवळचा संबंध आला आणि त्याचे कारण स्पष्ट होते. महाराष्ट्राचा उत्तर भाग निजामशाहीच्या अमलाखाली तर दक्षिण भाग आदिलशाहीच्या अमलाखाली मोडत होता. महाराष्ट्रातील मराठ्यांचे स्वातंत्र्य देवगिरीच्या पाडावाबरोबरच नष्ट झाले होते. तथापि, दिल्लीचे सुलतान अथवा बहामनी सुलतान यांच्या वर्चस्वाखाली आपला प्रदेश जात असता मराठ्यांनी काहीच विरोध केला नाही असे नाही. तथापि, मुस्लीम सत्तेचा जोर व मराठ्यांची दुही यामुळे त्यांना शेवटी राज्यकर्त्यांशी जुळवून घ्यावे लागले.

बहामनी राजवटीमध्ये तर राज्यातील मोठ्या अधिकाराच्या जागा मुसलमानांकडेच, विशेषतः, परदेशी मुसलमानांकडेच असत. इराण, इराक, अरबस्तान इत्यादी परक्या देशांमधून दक्षिणेत आलेले मुसलमान केवळ हिंदूंनाच कनिष्ठ समजत असत, असे नसून ते स्थानिक मुसलमानांनाही कमी दर्जाचे समजत. कारभारातही अशा परक्या मुसलमानांचा वरचष्मा असे. उदाहरण म्हणून निजामशाहीतील वजिरीच्या जागेचे देता येईल. अहमदनगरची निजामशाही धर्मांतरित मुसलमानाने स्थापन केलेली होती. तथापि, सोळाव्या शतकातील तिच्या वजीरपदावर बसलेल्या २६ वजीरांपैकी वीस वजीर परक्या देशांतील मुसलमान होते. बाकीचे सहा स्थानिक मुसलमान होते. इतर शाह्यांमध्येही कमी-अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती होती. जिथे स्थानिक मुसलमानांनाही वरच्या जागा नाकारल्या जात होत्या, तिथे हिंदूंना कोण विचारणार?

तथापि, सतराव्या शतकाच्या प्रारंभी अनेक मराठा घराणी दक्षिणेच्या राजकारणात हळूहळू पुढे आलेली दिसतात. जाधव, निंबाळकर, भोसले, घोरपडे, घाटगे, माने, मोरे, शिर्के, महाडिक, गुजर, मोहिते इत्यादी अनेक घराणी निजामशाही व आदिलशाही दरबारात सेवाचाकरी करताना दिसतात.


आपली लहानशी जहागीर व पाच-दहा हजारांची फौज सांभाळून सुलतानाची चाकरी शक्य होईल तेवढ्या इमानाने ते करत. अनेक वेळा परदेशी मुसलमानांपेक्षा हे मराठे सरदार सुलतानांना अधिक उपयोगी वाटत असले, तरी त्यांचा या मराठ्यांवर पूर्ण विश्वास नसे. तसेच मराठे सरदारांचाही सुलतानांवर विश्वास नसे. जसा धनी तसा चाकर. ज्या लखुजी जाधवरावांचे वर्णन ग्रॅन्ट डफने 'त्या काळातील सर्व मराठ्यांत सामर्थ्यशाली' असे केले आहे, त्यांचा भर दरबारात निजामशहाने खून करविला. ज्या शहाजीराजांना त्यांच्या कर्नाटकातील पराक्रमामुळे आदिलशहाने इ.स. १६४७मध्ये 'महाराज फर्जंद शहाजी भोसले' असे गौरवून राजपुत्राच्या तोडीचा मान दिला, त्यास अवघ्या दोन वर्षांच्या अवधीत कैद करून त्यांच्याच हातात बेड्या ठोकण्यात आल्या.

तेव्हा लखुजी काय किंवा शहाजीराजे काय, आज निजामशाहीत तर उद्या आदिलशाहीत तर परवा मोगलशाहीत गेले तर नवल वाटण्याचे कारण नव्हते. परक्यांच्या, परधर्मीयांच्या राज्याबद्दल त्यांना निष्ठा कशी वाटावी? पराक्रम, शौर्य, धडाडी, मुत्सद्देगिरी इत्यादी राज्यस्थापनेस आवश्यक असणारे गुण या मंडळींनी दाखविले होते; परंतु स्वतंत्र राज्यच स्थापन करावे ही कल्पना त्यांना पेलणार नव्हती. स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या कल्पनेचे शिवधनुष्य पेलण्याची शक्ती असणारा पुरुष अद्यापि उदयास आलेला नव्हता.

या मराठी सरदारांचे आणखी एक वैशिष्ट्य होते, ते म्हणजे त्यांच्यामधील दुही व झगडे. लखुजीराव राजे जाधव व शहाजीराजे भोसले ही तर रक्ताची नाती असलेली मंडळी; परंतु शिवपूर्वकालाचा इतिहास पाहिला तर ती आपसात हाडवैरी असल्याप्रमाणे झगडताना दिसतात. भोसले व घोरपडे यांचा वंश एकच; परंतु शहाजीराजे भोसल्यांस दगाफटका करून त्यांच्या हातात बेड्या चढविताना बाजी घोरपड्यास आपल्या वंशाचे स्मरण राहत नाही. अशा प्रकारचं वैर, झगडे फक्त मोठमोठ्या सरदारांतच होत असत असे नाही. खोपडे-जेधे यांसारख्या छोट्या-छोट्या देशमुख वतनदार मंडळींतही ते चालू होते. वतनासाठी खून व मारामाऱ्या हा तर शिवकालात नित्याचाच प्रकार होता. अशा प्रकारे मराठ्यांचा पराक्रम परकीयांची सेवा करण्यात आणि स्वकीयांचे रक्त सांडण्यात खर्च होत होता. या पराक्रमास यवनांचे पारिपत्य करण्याच्या कामास जुंपणारा नेता मराठ्यांना हवा होता.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## ज्ञानयोगी एकनाथ

**मंजुश्री गोखले**

पृष्ठे : ३१६
किंमत : ५२०

ज्ञान, भक्ती आणि लोककल्याण ही त्रिसूत्री...
सर्वसामान्यांसाठी ठरेल कल्याणकारी

महिना होता कार्तिक. तिथी होती द्वादशी. दुसरे दिवशी ज्ञानेश्वर माउली संजीवन समाधी घेणार होते. आदले दिवशीची रात्र. ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांच्या शेजारी बसले होते. सोपान, मुक्ताही तिथेच होते.

निवृत्तिनाथ म्हणाले, ''ज्ञानेशा, तुझा संजीवन समाधीचा निश्चय आज या घडीलाही कायम आहे, हे बघून मी निश्चिंत झालो आहे. हठयोगावर प्रभुत्व असणाऱ्या माझ्या या लाडक्या शिष्यानं कच खाल्लेली मला चालणार नाहीये.''

ज्ञानेशाने एकदा दादाकडे पाहिलं. तो आता या क्षणाला दादा कमी आणि गुरू अधिक भासत होता. ज्ञानेशाच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं. निवृत्तिनाथांच्या हातावर आपला हात ठेवत ज्ञानेशा म्हणाला,

''दादा! तुझा हा शिष्य कधीच तुझ्या मनाविरुद्ध वागणार नाही; पण....!'' बोलता-बोलता ज्ञानेशा थांबला.

निवृत्तिनाथांनी ज्ञानेशाच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. त्याचा चेहरा खिन्न होता. ''पण? पण काय ज्ञानेशा? मनात काही शंका आहे? काही विचारायचं आहे? सांगायचं आहे? बोल वत्सा! नि:संकोचपणे बोल!'' निवृत्तिनाथांनी जणू आदेश दिला आणि अभयही!

क्षणभर ज्ञानेशाचा चेहरा निवळला. एकच क्षण! एकच क्षण निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ता यांच्याकडे नजर टाकून ज्ञानेशा म्हणाला, ''दादा, एक खंत आहे मनात! बोलू का?''

''अरे, बोल ना! काय खंत आहे?'' निवृत्तिनाथांनी प्रेमळ स्वरात विचारलं.

''दादा, सगळं करता आलं; पण... पण गुरूंची सेवा नाही करता आली. ती करायची राहून गेली दादा! माझ्याहातून गुरूंची सेवा करायची राहून गेली. ही खंत माझ्या मनात कायम राहील आता!'' का कोण जाणे पण ज्ञानेशा एका दमात बोलला.

निवृत्तिनाथांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता उमटली. इतकी अलौकिक कीर्ती मिळवूनही ज्ञानेशाचे पाय आजही जमिनीवर होते याचंच ते द्योतक होतं. क्षणभर तिथे शांतता पसरली. तोच मुक्ता म्हणाली, ''दादा, मग तू उद्या समाधी घेऊच नको. तुला जेवढी करायची तेवढी गुरूची सेवा कर आणि मग समाधी घे!'' तिचा युक्तिवाद ऐकून ज्ञानेशा हसला.

तोच सोपान म्हणाला, ''मुक्ते, तो काय खेळ आहे? आज जमला नाही उद्या खेळायला?''

सोपानाच्या या वाक्यानं मुक्ताईचे आधीच पाण्यानं भरलेले डोळे आता वाहू लागले. ''तसं नाही सोपानदादा; पण त्या निमित्तानं का होईना ज्ञानादादाचं समाधी घेणं लांबतंय का, असं मी बघत होते. दुसरं काही नाही!'' गालावर ओघळणारे अश्रू न पुसता मुक्तानं समर्थन केलं.

''सोपाना, मुक्ता, ऐका जरा! शांत व्हा!'' असं सांगून त्यांना शांत करत

निवृत्तिनाथ ज्ञानेशाकडे वळले. ''ज्ञानेशा! अरे गुरुसेवा घडली नाही याची खंत लागून राहिली आहे ना तुझ्या मनाला? ज्ञानेशा, अरे तू संजीवन समाधी घेतो आहेस. आत्मबलाच्या साहाय्यानं तुझे पंचप्राण तू या पंचमहातेजात विलीन करतो आहेस. होय ना? अरे, मग ते चैतन्य तुला कधीही परत मिळवता येईल. कधीही त्या चैतन्याला सगुण-साकार रूप तू देऊ शकशील. कधीही ते चैतन्य एखाद्या जीवात्म्यात ओतून तू देह धारण करू शकशील. आणि मग असं केल्यावर तुला गुरुसेवाच काय, काहीही करता येईल. ज्ञानेशा, अरे अवघं २२ वर्षांचं वय आहे तुझं. खूप काही करायचं योजलं असशील आणि ते राहून गेलं असेल, ते सगळं तू नवीन देह धारण करून करू शकशील; मात्र ज्ञानेशा, एक गोष्ट लक्षात ठेव. एकतर हे करण्यासाठी मध्ये बराच कालावधी जावा लागेल. कमीत कमी दोन शतकांचा तरी. आणि दुसरं असं की जो देह धारण करशील तो अत्यंत सच्छील, अत्यंत धार्मिक, डोळस श्रद्धा जपणारा आणि तुझ्यासारखाच वर्णाश्रम न मानणारा असा असू दे! या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत ज्ञानेशा. या गोष्टी कटाक्षानं साधल्यास तरच तुझ्या हातून गुरुसेवा घडेल आणि आता तुझ्या मनाला लागलेली खंत दूर होईल. ज्ञानेशा, आणखी एक! गुरुसेवा घडली नाही ही तुझ्या मनाला लागलेली खंत तुझ्या मनाची कोमलता, गुरुविषयीचा तुझा आत्यंतिक आदर आणि तुझी पराकोटीची विनम्रता दर्शवते. ज्ञानेशा, तू माझा शिष्य आहेस याचा तर मला अभिमान आहेच; पण मी तुझा गुरू असल्याचा आज माझा मलाच अभिमान वाटतोय ज्ञानेशा. तुझा गुरू असण्याने मी धन्यता पावलोय, कृतार्थ झालोय हे मी आज या क्षणी तुला सांगतोय!''

निवृत्तिनाथ बोलत होते. सगळी कान देऊन ऐकत होती. निवृत्तीदादांच्या स्वरांतून एकाच वेळी गुरू, मोठा भाऊ, मार्गदर्शक, आई-वडील असे सगळेच जणू बोलत होते. त्यांचं बोलणं ऐकून ज्ञानेशाचा चेहरा उजळत गेला. निवृत्तीrदादा बोलायचा थांबला, त्या वेळी ज्ञानेशाच्या चेहऱ्यावर पूर्ण समाधान पसरलं होतं. त्याच्या मनात आता कसलीच खंत नव्हती किंवा कोणतीच शंकाही उरली नव्हती, याचंच ते द्योतक होतं. ज्ञानेशाचा समाधानी चेहरा बघून निवृत्तिनाथ भरून पावले. आता समाधी घेताना ज्ञानेशा परिपूर्ण मनानं समाधी घेणार होता. आपल्या मोठ्या दोन भावांचा हा संवाद सोपान आणि मुक्ता लक्ष देऊन ऐकत होते. त्यांचेही चेहरे उजळलेले होते. ती दोघंच

काय; पण उत्तररात्रीच्या त्या शांत वेळेत अवघं चराचर हा संवाद ऐकत होतं. तो ऐकण्यासाठी वाराही थांबला होता. घरासमोरचा पिंपळही स्तब्ध होता. चंद्रही पुसटसा डोकावत होता. निवृत्तिनाथ आणि ज्ञानेशाचा हा संवाद त्या वाहणाऱ्या इंद्रायणीनं ऐकला. अगदी आपलं वाहणं थांबवून ऐकला. 'आता हे भीमेला सांगितलं पाहिजे. मग ती कृष्णेला सांगेल आणि कृष्णा गोदावरीला.' इंद्रायणीनं मनाशी योजलं. ती तसंच करणार होती आणि तिनं केलंही.

ज्ञानेशाच्या समाधीला दोन शतकं उलटली. भागवत धर्माच्या झेंड्याखाली जमलेले सगळे संतही विठ्ठलस्वरूप झाले. महाराष्ट्र-भू पुन्हा पोरकी झाली. कर्मकांडाचा आणि वर्णाश्रमाचा अतिरेक पुन्हा व्हायला लागला. हे सगळं दु:खी मनानं बघत इंद्रायणी-भीमा-कृष्णा वाहत होत्या. कृष्णेनं गोदावरीला निरोप दिला होता आणि गोदावरी प्रतीक्षा करत होती. निवृत्तिनाथांनी ज्ञानेशाला सुचवलेल्या मार्गाच्या पूर्ततेची. इंद्रायणीकडून भीमेला, भीमेकडून कृष्णेला आणि कृष्णेकडून गोदावरीला तो त्या दोन भावंडांच्यात झालेला संवाद जसाच्या तसा ऐकायला मिळाला होता. दोन शतकं तर उलटली होती त्या संवादाला; मात्र ज्यांनी ज्यांनी हा संवाद ऐकला होता त्या सगळ्यांना, सृष्टीच्या सगळ्या शिलेदारांना – वाऱ्याला, आकाशाला, चंद्राला, पिंपळाला आणि नद्यांनासुद्धा प्रतीक्षा होती त्या मार्गाच्या पूर्ततेची. प्रतीक्षा...

पैठण... गोदावरीच्या काठावर वसलेलं एक समृद्ध गाव. गोदावरीच्या निरंतर वाहण्यानं सुजलाम् सुफलाम् झालेलं. अन्नसंपदा भरपूर असल्यानं गावावर एक प्रकारची सुखासीनता असायची. व्यापार, उद्योगधंदे, व्यवसाय, ज्ञानसंपन्नता, भक्तिप्रवणता अशा सगळ्या क्षेत्रांत पैठणमध्ये सुबत्ता होती, समृद्धी होती. व्यापार-उदीम जोरात होते. गर्भरेशीम, रेशमी, जरतारी, बुट्टेदार, भरजरी, कलाकुसरीचं कापड, लुगडी आणि सर्वांत महत्त्वाची म्हणजे पैठणी. पैठणीचा तिथे चालणारा व्यवसाय हा पैठणीची कीर्ती घेऊन पार उत्तर हिंदुस्थानापर्यंत पोहोचला होता आणि दक्षिण भारत तर त्यानं कधीच काबीज केला होता.

पैठण जसं व्यापार-उदिमानं समृद्ध होतं तसंच ज्ञान, विद्वत्ता आणि धर्मकार्य यानेही संपन्न होतं. पैठणला असलेलं धर्मपीठ महाराष्ट्रातल्या प्रमुख धर्मपीठांपैकी एक होतं, जिथं नेहमी धर्मशास्त्रावर चर्चा चालायच्या.

धर्मविषयक कायद्यांची मांडणी, पुनर्बांधणी, नवीन कायद्यांची आखणी हे सगळं तिथेच चालायचं. वर्णाश्रमाचा पुरस्कार आणि अंमलबजावणी समाजात काटेकोरपणे केली जाते आहे की नाही यावर या धर्मसभेतले, धर्ममार्तंड लक्ष ठेवून असायचे. कुठे असा जातिधर्मात भ्रष्टाकार दिसला, तर त्या व्यक्तीला तिथल्यातिथे शिक्षा सुनावली जायची. ज्ञानेश्वर माउली आपल्या भावंडांसह शुद्धिपत्र घ्यायला पैठणच्या धर्मसभेत आली होती, असं इथले धर्मभास्कर अभिमानाने सांगत. पैठण हे एक धर्मक्षेत्र, तीर्थक्षेत्र म्हणूनही प्रसिद्धीला आलेले होतं. 'प्रतिष्ठान' असं पौराणिक नाव असलेलं पैठण प्राचीन काळात सातवाहन राजांच्या राजधानीचं शहर होतं. विद्या-कला आणि संस्कृती यांची समृद्धी या काळात झाली होती. त्यानंतर गोदावरीला महापूर आल्यामुळे पैठण काही प्रमाणात नामशेष झालं होतं; पण कृष्णदेवराय राजाच्या काळात पैठण पुन्हा नावारूपाला आलं, तेही पूर्वीपेक्षा जास्त. त्यानंतरच्या बहामनी काळातही पैठणचा इतिहास हा वैभवशाली परंपरा सांगणारा आहे. आजही पैठण त्याच दिमाखात उभं होतं. फक्त राजवट बदलली होती. यवनांची सत्ता महाराष्ट्रभर पसरली होती. जनसामान्यांना राजसत्तेचाच धर्म स्वीकारावा लागत होता, तर या यवनी सत्तेला आव्हान देता येत नाही म्हणून सगळा बुद्धिवादी वर्ग कर्मकांडात गुंतला होता. पैठणची समृद्धी आपल्या जागेवर होती; पण समाजाची मात्र अधोगती होत होती. आपलं इतिकर्तव्य जाणून संथपणानं वाहणारी गोदावरी मात्र कुणीतरी या समाजाचा उद्धारकर्ता येईल, म्हणून जवळजवळ सव्वा-दोन शतकं वाट बघत होती. तिची प्रतीक्षा आता लवकरच संपणार होती.

नृसिंहवाडीजवळच्या म्हैशाळ इथे राहणारे भास्करपंत कुलकर्णी. दत्तभक्त. त्यांचा कापडाचा व्यापार होता. तसा तो बरा चालत असे. चार पैसे गाठीला राहत; पण व्हायचं असं की पावसाळ्यात कृष्णा नदीला पूर आला की सगळीकडे ते पाणी पसरायचं. त्यामुळे पावसाळ्याचे चार महिने आणि पुढे चिखल वाळेपर्यंत दोन महिने असा सहा महिने व्यापार व्हायचाच नाही. त्यात नृसिंहवाडी, शिरोळ, म्हैशाळ ही गावंही अगदी छोटी-छोटी – साधारण ५००/१००० उंबऱ्यांची. त्यातही सणासुदीला कापड खरेदी करणारी घरं हाताच्या बोटावर मोजावी इतकी. त्यामुळे भास्करपंतांचा म्हणावा तसा व्यापार व्हायचा नाही. कुणीकडनं हातातोंडाची गाठ पडायची एवढंच. त्यातच विवाह

झालेला. आता संसारही वाढणार. असा सगळा विचार करून भास्करपंतांनी म्हैशाळ सोडून पैठणची वाट धरली. म्हैशाळात त्यांच्या शेजारी राहणारा गंगाराम वाणीसुद्धा व्यापार वाढवण्यासाठी पैठणला गेला होता. तो चार महिन्यांनी बायका-पोरांना न्यायला परत आला, तेव्हा त्याने भास्करपंतांना पैठणचे वर्णन ऐकवले. तिथल्या समृद्ध बाजारपेठेचे वर्णन ऐकवून गंगाराम भास्करपंतांना म्हणाला, ''पंत, तुमी बी चला पैठणला. हितल्यापरीस मोप धंदा हुईल तितं! लयी मोठी बाजारपेठ हाय ती!'' गंगारामचं हे बोलणं ऐकून भास्करपंतांनी पत्नीशी विचारविनिमय केला आणि दोघांनी मिळून पैठणला जाण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे आवराआवर करून गंगारामच्या परिवारासोबतच भास्करपंतांनी म्हैशाळ सोडलं. जाण्यापूर्वी नृसिंहवाडी इथे जाऊन दत्तात्रेयांच्या पादुकांचं दर्शन घेऊन त्यांना साकडं घातलं, ''दत्तगुरु, उज्ज्वल भविष्यासाठी तुमचा शेजार सोडून पैठणला दूर जातो आहे. तुमच्या भक्तीला अंतरणार नाही; पण तुमचं लक्ष असू दे! कृपादृष्टी राहू दे!'' असं दत्तात्रेयांना विनवून भास्करपंतांनी पादुकांसमोर मस्तक टेकवलं. डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी पादुकांना अभिषेक केला. भास्करपंत काही क्षण तसेच बसले आणि त्यांच्या कानात कुणीतरी शब्द उच्चारले– ''तथास्तु!'' पंतांनी चमकून इकडे-तिकडे पाहिलं. भल्या पहाटेची वेळ होती. काकड्याच्याही आधीची. ना मंदिरात कुणी होतं, ना नदीच्या काठावर. आपल्याला दत्तगुरूंनीच आशीर्वाद दिला, या जाणिवेनं पंत भरून पावले. पुन्हा एकदा पादुकांवर मस्तक टेकवून त्यांनी नमस्कार केला आणि दोन बैलगाड्या पैठणच्या दिशेने मार्गस्थ झाल्या.

पैठणला थोड्याच दिवसांत पंतांचं चांगलं बस्तान बसलं. व्यापार-उदीम चांगला होऊ लागला. व्यवसायात चांगला जम बसला. पंतांनी तिथे छान मोठं घर घेतलं. आपल्या सचोटीनं आणि सज्जनपणानं चांगला नावलौकिक मिळवला. भास्करपंतांना तिथे पुत्रलाभ झाला. त्याचं नाव भानुदास. पंत दत्तभक्त होतेच; पण घराणे वारकरी. त्यामुळे विठ्ठलभक्तीची परंपरा घराण्यात होतीच आणि वारीचीही. भानुदासावरही असेच उत्तम संस्कार होत होते; पण भानुदास जसा कुशाग्र बुद्धीचा तसाच तो हट्टीही होता. एकपाठी होता; पण गिरवणं, पाठ करणं, पुन्हा-पुन्हा तेच-तेच लिहिणं हे त्याला अजिबात आवडायचं नाही. पंत सकाळी दुकानात जाताना भानुदासाला पाठ देऊन जायचे. तो गिरवायला, पाठांतर करायला सांगून जायचे; पण त्यांनी पाठ दिला

की अगदी थोड्या वेळातच तो भानुदासाला ग्रहण व्हायचा आणि मग नंतरचं सगळं करायचा त्याला कंटाळा यायचा. असं पाच-दहा वेळा झालं की पंत रागवायचे. भानुदासाचं म्हणणं असं असायचं की 'मला ते ग्रहण झालंय की! आता पुन्हा-पुन्हा तेच-तेच काय करायचं?' तर पंतांचं म्हणणं असं असायचं की सरावानं ज्ञान पक्कं होतं; पण भानुदास ऐकायचा नाही. एक दिवस या गोष्टीवरून पंत भानुदासाला खूप बोलले.

''परमेश्वरानं बुद्धी दिलीये तिचा वापर नीट केलास, तर आयुष्यात काहीतरी मिळवशील.'' असं पंत रागानं बोलल्यावर भानुदास म्हणाला,

''बाबा, मग मी त्या परमेश्वराचाच शोध घेतो, ज्यानं ही बुद्धी दिलीये!'' असं पंतांना सांगून दहा वर्षांचा भानुदास घरातून बाहेर पडला. पंतांना वाटलं येईल थोड्या वेळानं परत. ते आपल्या दुकानात गेले.

भानुदास बाहेर पडला ते तडक चालू लागला. चालत-चालत तो गावाबाहेर पडला. तसाच चालत राहिला. संध्याकाळ झाली. भानुदासाला एक पडझड झालेलं मंदिर दिसलं. तो त्या मंदिरात शिरला. मंदिराच्या भिंतींची पडझड झाली होती. मूर्ती तर नव्हतीच; पण मंदिराच्या जमिनीच्या एका कोपऱ्यातून एक भुयार गेलेलं दिसत होतं. तिथे तर माणसांची अजिबातच वर्दळ नव्हती. मंदिरच पडकं होतं. तिथे कोणी येत-जात नसे, तर भुयारात कोण जाणार? भानुदास जरा रागात होता आणि जरा दु:खीही! त्यानं मागचा-पुढचा विचार न करता त्या भुयारात प्रवेश केला. भुयार खोल-खोल होतं. आत गुडूप अंधार होता; पण देवाचा शोध घ्यायचाच असा निश्चय केलेला भानुदास अजिबात भ्यायला नाही. तो तसाच अंधारात चालत राहिला. तिथे त्याला एक शिळा पायाला लागली. भानुदास त्या शिळेवर चढून बसला. रात्रभर तो त्या शिळेवर बसून राहिला. सकाळ झाली. सूर्याची किरणं थोडीशी भुयारात आली. भुयारात थोडा उजेड पसरला. त्या उजेडात भानुदासाला दिसलं, तो बसला होता त्या शिळेसमोर असलेल्या त्या भुयाराच्या भिंतीवर सूर्याची एक प्रतिमा होती. ती बघून भानुदासानं सूर्योपासना सुरू केली. त्या भुयारात गायत्री मंत्राचे स्वर घुमायला लागले,

''ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यम्। भर्गो देवस्य धीमहि। धियो योनः प्रचोदयात्।।'' एक नाही, दोन नाही, तीन नाही, सात दिवस आणि सात रात्र भानुदास सूर्योपासना करत राहिला. तहान नाही, भूक नाही, अन्न नाही,

पाणी नाही. भानुदास सूर्योपासना करत राहिला. आठवे दिवशी सकाळी ते अंधारलेलं भुयार लख्ख प्रकाशानं उजळलं. त्या मूर्तीतून साक्षात सूर्यनारायण प्रकट झाले. त्यांनी हाक मारली, ''भानुदास, डोळे उघड! मी आलो आहे!''

भानुदासाने डोळे उघडले. विचारलं, ''आपण कोण?''

''मी सूर्यनारायण! तू गेले सात दिवस माझी उपासना करत होतास ना? मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुझी बुद्धी सूर्याप्रमाणे तेजस्वी होईल आणि तुझ्या कुळात सूर्याप्रमाणे तेजस्वी पुत्र जन्माला येईल आणि तो आपल्या बुद्धीनं अवघं चराचर उजळून टाकेल, असं वरदान मी तुला देतो. आता माझा प्रसाद म्हणून, हे दूध पी आणि घरी जा. घरी तुझे आई-बाबा तुझी वाट बघत बसले आहेत. तुझी काळजी करत आहेत.'' असे सांगून सूर्यनारायणानी भानुदासाला दूध प्यायला दिलं आणि ते गुप्त झाले.

भानुदास घरी परतला. पंतांनी त्याला जवळ घेतलं. आईनं अलाबला घेतली. मायेनं जेवू घातलं. सात दिवस कुठे होतास असं पंतांनी विचारल्यावर भानुदासानं सगळी हकिकत पंतांना सांगितली. आपल्या लेकाला साक्षात सूर्यनारायणाने आशीर्वाद दिल्याचे कळताच पंतांना खूपच अभिमान वाटला. आधीच भानुदास कुशाग्र बुद्धीचा होता. आता तर त्याला साक्षात सूर्यनारायण प्रसन्न झाले होते. भानुदासांची बुद्धी आणखी उजळून निघाली. भानुदास मोठे झाले. अभंगरचना करू लागले. व्यापार- उदीम करता-करता विठ्ठलभक्तीत रममाण होऊ लागले. नित्यनेमाने पंढरीच्या वारीस जाऊ लागले.

मात्र, एकदा एक घटना अशी घडली की ज्यामुळे अवघा महाराष्ट्र भानुदासांचा ऋणी झाला. झालं असं की एके वर्षी भानुदास वारीसाठी पंढरपूरला गेले; पण तिथे सगळा हाहाकार माजला होता; कारण सावळ्या विठ्ठलाची मूर्ती मंदिरात नव्हतीच. विठ्ठलाची मूर्ती गाभाऱ्यात नव्हतीच. विठ्ठलाच्या पायाखालच्या विटेसकट मूर्ती गायब होती. भानुदासानी चौकशी केली तेव्हा त्यांना समजलं की, 'कर्नाटक राज्याचा राजा कृष्णदेवराय पंढरपूरला आला होता. त्याला विठ्ठलाची ती सुंदर मूर्ती इतकी आवडली की ती मूर्ती उचलून तो घेऊन गेला. ती नेऊन त्याने हंपीजवळच्या अनागोंडी गावात ठेवली आहे. तिथे त्यानं एक भव्य मंदिर बांधलं आहे आणि त्या मंदिरात विठूरायाची मूर्ती ठेवली आहे. मूर्तीच्या भोवती कडेकोट बंदोबस्त आहे आणि सख्त पहारा आहे. तिथे कुणालाही जाणं शक्य नाही.' भानुदासांना हे समजलं.

विठ्ठलभक्तांच्या मनातील ती अस्वस्थता त्यांच्या लक्षात आली. आपणही वारकरी आहोत, आपण यासाठी काहीतरी केलं पाहिजे, असं त्यांच्या मनानं घेतलं. त्यांनी कनोजी ब्राह्मणाचा वेष धारण केला आणि ते कर्नाटकात जायला निघाले. मजल-दरमजल करत ते कर्नाटकात पोहोचले. वाटेत ठिकठिकाणी कृष्णदेवराय राजाच्या कलासक्ततेचं, कल्याणकारी राज्यकर्त्याचं दर्शन घडत होतं. काही दिवसांनी ते हंपीला पोहोचले. तिथे जाऊन त्यांनी राजाची भेट घेतली. विठ्ठलभक्तांची बिकट अवस्था कथन केली; पण राजा विठ्ठलमूर्तीच्या जणू प्रेमातच पडला होता. त्यानं विठ्ठलमूर्ती द्यायला साफ नकार दिला. त्याची भेट घेऊन भानुदास परतले. धर्मशाळेत मुक्काम केला. इतके दिवसांच्या पायपिटीनं थकलेल्या भानुदासांचा क्षणभर डोळा लागला आणि त्यांना भास झाला की विठ्ठल आपल्याला हाका मारतोय, म्हणतोय, ''भानुदास, मला घेऊन चल, मला भक्तांच्या मेळ्यात राहायचं आहे. माझे भक्त हीच माझी संपत्ती आहे. इथे या वैभवशाली मंदिरात कडी-कुलपात मला करमत नाही. मला घेऊन चल. ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडं, नामदेव, जनी, चोखा या सगळ्यांनी मला सतत भक्तांच्या मेळ्यात राहायची सवय लावली आहे. इथे मला एकटं-एकटं वाटतं. इथे सगळं वैभव आहे; पण माझं खरं वैभव तिथे आहे. तू मला घेऊन चल!'' त्या आवाजानं भानुदासांची झोप उडाली. ते उठलेच. मध्यरात्र झाली होती.

आपली गासडी घेऊन ते धर्मशाळेच्या बाहेर पडले. त्यांनी थेट ते विठ्ठल मंदिर गाठलं. मध्यरात्रीसुद्धा ते मंदिर लक्ष पणत्यांनी उजळलं होतं. मंदिराच्या भोवती खडा पहारा होता. नंग्या समशेरी घेऊन पहारेकरी फिरत होते. भानुदास मंदिराच्या मुख्य दरवाज्याबाहेर उभे राहिले. पहारेकऱ्यांना दिसू नये म्हणून ते एका खांबाच्या आड उभे राहिले. फिरता-फिरता पहारेकरी मंदिराच्या बाजूच्या भागात गेल्याचं बघून त्यांनी हळू आवाजात विठ्ठलाला हाक मारली, ''विठूराया, मी आलोय रे! मी तुला नेण्यासाठी आलोय!'' विठ्ठलानं ती हाक ऐकली असावी. मंदिराच्या बाजूला गेलेला पहारेकरी तिथेच झोपला. बाकीच्या पहारेकऱ्यांनाही जागच्याजागी झोप लागली. त्यांची चाहूल बंद झाली तशी भानुदास पुढे झाले. मंदिराचे सगळे दरवाजे आपोआप उघडले. कडी, कोयंडे, कुलपं आपोआप निघाली. भानुदास मंदिरात शिरले. गाभाऱ्यात तो होता. होता विटेवरच; पण भोवताली हिरेमाणकांची सजावट होती. अंगभर रत्न, माणकांचे अलंकार लखलखत होते. माथ्यावर हिरेजडित मुकुट होता. चारही बाजूला

पुरुषभर उंचीच्या सोन्याच्या समया तेवत होत्या. त्यात अत्तर घातले असावे; कारण अत्तराचा घमघमाट गाभाराभर दरवळत होता. मूर्तीभोवती हिरेमाणकांनी जडवलेली महिरप होती. मूर्तीसमोरच्या सोन्याच्या ताटात पंचपक्वान्नं होती. सोन्याच्या वर्खाचा विडा होता. विठूरायाची मूर्ती या सगळ्यांमुळे अगदी लखलखत होती. हे सगळं पाहून भानुदासांची नजर मूर्तीच्या चेहऱ्याकडे गेली. हिरेमाणकांवर परावर्तित होऊन पडलेल्या प्रकाशानं चेहरा तर उजळला होता; पण चेहऱ्यावर दु:ख होतं. उदासीनता होती. विरह होता. वियोग होता. आठवणींची व्याकुळता होती. एकटेपणाचं दु:ख होतं. परक्या ठिकाणी आलो असल्याची बोच होती. आपल्या माणसांपासून दुरावल्याची खंत होती. कडी-कुलपात राहावं लागल्याचा राग होता. भानुदासांनी त्या सावळ्या चेहऱ्यावर उमटलेले हे सगळे भाव वाचले आणि त्यांना भरून आलं. हे निश्चित की विठूराया मूर्तिरूपात इथे असला तरी प्रत्यक्षात तो पंढरपुरातच असणार होता. हेही तितकंच खरं की सगुणरूपात तो इथे असला तरी निर्गुण रूपात तो चंद्रभागेच्या वाळवंटात असणार होता; पण गंभीर बाब अशी होती की त्याच्या भक्तांचं विठ्ठलाच्या सगुण रूपावर प्रेम होतं. त्या सगुण रूपातच तो निर्गुण, निराकार वसतो आहे यावरच त्यांची श्रद्धा होती, विश्वास होता आणि या श्रद्धेतच तर विठूराया अडकला होता. या भक्तीतच तर तो गुंतला होता.

भानुदासानी विठ्ठलाचा तो दु:खी चेहरा पाहिला आणि त्यांनाही भरून आलं. विठ्ठलमूर्तीला एकवार नमस्कार करून भानुदास पुढे झाले. आसपासची चाहूल घेऊन त्यांनी मूर्तीच्या पायाखालच्या विटेला हात घातला. विटेसकट ती मूर्ती उचलली आणि ती घेऊन ते आल्यापावली बाहेर आले. कड्या-कोयंडे-कुलपं अजून उघडीच होती. भानुदास जसजसे एकेक दालन ओलांडत मूर्ती घेऊन बाहेर येत गेले, तसतशी त्यांच्या पाठीमागच्या दालनांची दारं बंद होऊ लागली. त्याला कडी-कोयंडे-कुलपं बसू लागली. विठ्ठलमूर्ती घेऊन भानुदास पावलांचा आवाज न करता मंदिराबाहेर आले. बाहेरचे पहारेकरी अजून झोपलेलेच होते. मंदिराच्या मुख्य दरवाज्याजवळ भानुदास आले. तोही दरवाजा, जो चांगला भला मोठा, एखाद्या गडकोट किल्ल्याचा असावा तसा भक्कम दरवाजा आपोआप उघडला. भानुदास मूर्ती घेऊन बाहेर आले आणि मंदिराबाहेरच्या प्रांगणात राजाच्या सैनिकांनी त्यांना वेढा घातला.

◆

# अभिप्राय




## हॅच्युकीसुनास्की

**आबा महाजन**

### अद्‌भुतरम्य जगाची सफर : 'हॅच्युकीसुनास्की'

मराठी बालसाहित्यामध्ये अद्‌भुतरम्य गोष्टी तशा अपवादानंच लिहिल्या जातात. ज्या लिहिल्या जातात त्यातही फार नावीन्यपूर्ण कल्पना असतात असं नाही. तेच ते विषय घेऊन अद्‌भुतरम्यतेच्या नावाखाली त्या साहित्याला बालवाचकांपुढे ठेवलं जातं. खरंतर आजच्या बालकांची अभिरुची बालसाहित्यातील

कल्पनाविश्वाच्या कितीतरी पुढे गेलेली दिसून येते. विविध दृक्श्राव्य माध्यमांतून भन्नाट अशी कल्पनासृष्टी बालकांना अनुभवायला मिळत असताना लेखकांनी आपल्या विचारांची आणि सीमित कल्पनांची कात टाकून नावीन्यपूर्ण असं काही लिहिणं ही काळाची गरज बनली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध बालसाहित्यिक 'आबा महाजन' यांचं 'हॅच्युकीसुनास्की' हे अफलातून पुस्तक वाचनात आलं. परग्रहावरील सजीव सृष्टी हा सर्वांच्याच कुतूहलाचा विषय असतो. त्यावर मोठ्या प्रमाणात संशोधनही केलं जातं. किंबहुना, अनेक संशोधकांनी या विषयाचं कोडं उलगडण्यात आपली हयात खर्च केलेली दिसून येते.

बालमनालाही या विषयाचं कायम आकर्षण असतं. परग्रहावरील एलियन्सला पाहिल्याचे दाखलेही जगभर दिले जातात. त्यामुळे त्यांच्या विषयीची उत्सुकता आणि कोडं आणखीनच वाढलेलं दिसून येतं. आबा महाजन यांनी हॅच्युकीसुनास्की असं गमतीदार नाव असलेल्या ग्रहावरच्या रहिवाशांची गोष्ट सांगितली आहे. 'धुमशुक कुमुशाक वांगडू' हा या गोष्टीचा नायक आहे. ज्याचं वय दोनशे वर्षं, दोन महिने आणि दोन दिवस असल्याचं तो सांगतो. त्याची उंचीही कधी एकसारखी नसते. ती कधी असते एक इंच तर कधी चक्क १०० फूट! तो आपला रंगही बदलू शकतो. त्यामुळे या वांगडूचा निश्चित रंगही सांगणं कठीण आहे.

सामान्यपणे, त्याला माणसासारखे दोन हात असले तरी त्याला ते चारही करता येतात. अशा या अजबगजब धुमशुक वांगडूची ही अद्‌भुतरम्य कहाणी या पुस्तकात सांगितलेली आहे.

'हॅच्युकीसुनास्की' या पुस्तकातील कथानक अतिशय वेगवान आहे. त्यामुळे ते वाचकावर लवकरच पकड घेतं आणि पुढे काय? पुढे काय? अशी उत्सुकता कायम टिकवून ठेवतं. ही बाब कोणत्याही चांगल्या फॅन्टसीचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य असतं. जे लेखकानं या पुस्तकात साध्य केलेलं आहे. आबा महाजन यांनी कथानकावरील आपली पकड कुठेही सैल होऊ न देता, अतिशय खुबीने अनेक उपकथानकांचा या पुस्तकात समावेश केलेला आहे. त्यामुळे गोष्टीचा आवाका तर वाढलेला आहेच,

मात्र त्यातील रंजकताही त्यामुळे द्विगुणीत झालेली आहे.

जरी ही एका एलियनची गोष्ट असली, तरी मानवी भावभावना आणि मूल्यांची जोड दिल्यामुळे वाचकाला ती आपल्या जवळची वाटते. वरवर पाहता ही कहाणी धुमशुक वांगडूच्या पराक्रमाची गोष्ट वाटत असली तरी मानवी स्वभावाचे अनेक पदर त्याच्या रूपाने लेखकाने उलगडून दाखवलेले आहेत. त्यामुळे त्याचं व्यक्तिमत्त्व अधिक खुललेलं दिसून येतं. या वांगडूला आई-बाबा आहेत तशी मित्रमंडळीही आहे. त्याला नवनवीन गोष्टी जाणून घेण्याची आवड आहे. त्यादृष्टीने आपण संशोधक आहोत आणि पृथ्वीवर संशोधन करण्यासाठी आलेलो आहोत हे तो आवर्जून सांगतो.

या गोष्टीत धुमशुक वांगडूसह एक खलनायकही आहे. त्याचं नाव 'गेमशुक फेंगडू'. बऱ्याच वेळा ही या दोघांमधील संघर्षाची कहाणी असल्याचं वाटतं, मात्र चांगल्या-वाइटाच्या संघर्षात शेवटी चांगल्याचाच विजय होतो; पण त्याआधी या संघर्षाला अनेक कंगोरे आहेत, जे लेखकाने फार उत्तम रीतीनं रंगवलेले आहेत.

या पुस्तकाच्या शीर्षकासोबतच त्यातील पात्रांची नावंही बालवाचकांच्या गालावर हास्याची लकेर उमटवणारी आहेत. वांगडू, फेंगडू, हॅच्युकोबा देव, टेंगडू अशी पात्रं संपूर्ण पुस्तकात धमाल करताना दिसतात. झाडांची नावंही कुयास्को, सिरापोटॉक, निमायास्को, पिपलूनुस्की, चियाचियास्को अशी गमतीदार आहेत.

या कथानकामध्ये लेखकाने अनेक नवनवीन कल्पना अगदी सहजतेने पेरल्या आहेत. हॅच्युकीसुनास्की ग्रहावर पाण्याची गरज असली की, तेथील रहिवासी ढगाला मेसेज करतात. त्यावर ढग गर्जना करून रिप्लाय देतात. ढगांनाही किती पाऊस पाडायचा याची वेळ ठरवून दिलेली असते. धो-धो सांगितलं तर धो धो. रिमझिम सांगितलं तर रिमझिम. मुसळधार तर मुसळधार ते ढग पाडू शकत असतात. अशा नावीन्यपूर्ण कल्पनांमुळे ही गोष्ट वाचनीय झाली आहे.

बालसाहित्यातील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक आबा

महाजन हे एक सिद्धहस्त लेखक आहेत. ते सध्या तहसीलदार पदावर कार्यरत असले तरी पूर्वी तेही एक शिक्षक होते. त्यामुळे बालमनाचा आणि बालकांच्या भावविश्वाचा त्यांना जवळून परिचय आहे. आपल्या दीर्घ साहित्यिक कारकिर्दीत त्यांनी जाणीवपूर्वक बालकांसाठी विपुल अशी साहित्यनिर्मिती केलेली आहे. त्यात कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबरी, पोस्टर कविता अशा साहित्याचा समावेश करता येईल.

'हॅच्युकीसुनास्की' हे १४८ पृष्ठांचं पुस्तक 'मेहता पब्लिशिंग हाऊस' या नामवंत प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेलं आहे. पुस्तकातील सगळी पृष्ठं रंगीत आहेत. कथानकात जागोजागी 'राजेश लवळेकर' या चित्रकाराने रेखाटलेली चित्रं पेरलेली आहेत. त्या चित्रांमुळे तर गोष्टीची रंजकता आणखी वाढते. आपल्या लौकिकाला साजेसं असं या पुस्तकाचं निर्मितीमूल्य राहील याची मेहता पब्लिशिंग हाऊसने काळजी घेतली आहे. एकंदरीत 'हॅच्युकीसुनास्की'च्या रूपाने एक नवीन आणि फ्रेश फॅन्टसी बालवाचकांसाठी आबा महाजन यांनी साकार केलेली आहे. भविष्यामध्येही वांगडूच्या आणि इतरही अद्भुतरम्य गोष्टी त्यांनी बालवाचकांना सांगाव्यात, जेणेकरून मराठी बालसाहित्यातील अद्भुतरम्य साहित्याचं दालन अधिकाधिक समृद्ध होत जाईल.

**- डॉ. विशाल तायडे**
छत्रपती संभाजीनगर

## १६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर, २०२६ दरम्यानचे दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन**

'नाथ हा माझा...', 'रेशीमगाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६६५ /- । सवलत किंमत ५०५/-**

---

**१६ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन**

'रुचिरा भाग-१', 'रुचिरा भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ५००/-**

---

**१७ सप्टेंबर-अनंत पै यांचा जन्मदिन**

'आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र', 'आत्मविश्वासाचा कानमंत्र', 'उत्तम स्मृतींचा कानमंत्र', 'यशाचा कानमंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ५००/- । सवलत किंमत ३१५/-**

---

**१८ सप्टेंबर - लान्स आर्मस्ट्राँग यांचा जन्मदिन**

'इट्स नॉट अबाउट द बाइक' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**१९ सप्टेंबर - शरद दळवी यांचा जन्मदिन**

'चित्रमय बोधकथा भाग-१ (दोन पुस्तकांचा संच)', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १२०/- । सवलत किंमत ९०/-**

'एकलव्य', 'समर्पिता' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७७५/- । सवलत किंमत ५२३/-**

---

**१९ सप्टेंबर - माइल्स टेलर यांचा जन्मदिन**

'सम्राज्ञी : महाराणी व्हिक्टोरिया आणि भारत' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४८८/-**

**२१ सप्टेंबर - स्नेहल जोशी यांचा जन्मदिन**

'नीलकंठ', 'प्लँचेट', 'तळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-**

**२१ सप्टेंबर - ख्रिस गेल यांचा जन्मदिन**

'सिक्स मशिन' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२१ सप्टेंबर - दीपा पोरे यांचा जन्मदिन**

'ज्ञानदा निबंधमाला' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ११०/- । सवलत किंमत ६९/-**

**२३ सप्टेंबर - डी.एस. इटोकर जन्मदिन**

'A to Z विज्ञान', 'छंदातून विज्ञान', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणी विज्ञानाची', 'खेळणीच खेळणी', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'साधी यंत्रे', 'वाचनातून विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'विज्ञानातील गमतीजमती', 'विज्ञानातील रंजकता', 'छोट्यांसाठी हवा, पाणी आणि प्रकाशाचे प्रयोग', 'छोट्यांसाठी चुंबक, विद्युत आणि ध्वनीचे प्रयोग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १९६०/- । सवलत किंमत ११७६/-**

**२३ सप्टेंबर - रेई किमुरा जन्मदिन**

'जॅपनीज रोझ', 'जॅपनीज ऑर्किड', 'जॅपनीज मॅग्नोलिया', 'मी एरिक', 'आवा मारू-टायटॅनिक ऑफ जपान', 'अ नोट फ्रॉम इचियो', 'वादळफूल', 'मदाम बटरफ्लाय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १७७०/- । सवलत किंमत ११९९/-**

**२६ सप्टेंबर- दिलिप दोंदे यांचा जन्मदिन**

'सागरी परिक्रमेचा पराक्रम' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२६ सप्टेंबर- महेश कोठारे यांचा जन्मदिन**

'डॅम इट आणि बरंच काही' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ७५०/- । सवलत किंमत ५२५/-**

**२९ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन**

'जादूचं रबर आणि इतर गोष्टी' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २१०/- । सवलत किंमत १३७/-**

**२९ सप्टेंबर - जागतिक हृदय दिन**

'हृदयविकार निवारण', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'चला जाणून घेऊ या! ध्यानसाधना', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७१५/-। सवलत किंमत ४२९/-**

**३० सप्टेंबर-एली वायझल यांचा जन्मदिन**

'नाइट' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत १००/-**

**३० सप्टेंबर - जागतिक अनुवाद दिन**

सर्व अनुवादित पुस्तकांवर ३५ टक्के सवलत.

**(किमान खरेदी १०००रु.)**

## खालील संचांवर १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत

**१ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'संवादु अनुवादु', 'केतकरवहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८६०/- । सवलत किंमत ५१६/-**

**१ ऑक्टोबर - अपर्णा वेलणकर यांचा जन्मदिन**

'फॉर हिअर, ऑर टू गो?' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

**१ ऑक्टोबर - डॉ. व्ही. अरविंद यांचा जन्मदिन**
‘दृष्टिदाता’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २५३/-**

**२ ऑक्टोबर - गांधी जयंती**
‘दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी’, ‘महात्मा गांधी आणि तीन माकडे’, ‘मोहनदास’, ‘फ्रिडम ॲट मिडनाइट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७५५/- । सवलत किंमत १०९५/-**

**३ ऑक्टोबर - गुरुचरण दास यांचा जन्मदिन**
‘द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४४९/-**

**८ ऑक्टोबर - तहमिमा अनम यांचा जन्मदिन**
‘आहे कट्टर तरी...’, ‘तेच दिन सोनेरी...’, ‘झुबेदा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ८४९/-**

**९ ऑक्टोबर - सुधा मेनन यांचा जन्मदिन**
‘आघाडीचे महिला नेतृत्व’, ‘दिव्यगुणी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५७५/- । सवलत किंमत ३४५/-**

**१० ऑक्टोबर - आर.के. नारायण यांचा जन्मदिन**
‘हलवाई’, ‘वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३४९/-**

**१२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन**
‘आंधळी’, ‘आंधळ्याचे डोळे’, ‘अनोळख’, ‘अनुबंध’, ‘चौघीजणी’, ‘गवती समुद्र’, ‘गोंदण’, ‘कविता स्मरणातल्या’, ‘किनारे मनाचे’, ‘लेखक आणि लेखने’, ‘मेघदूत’, ‘निमित्तानिमित्ताने...’, ‘पावसाआधीचा

पाऊस', 'पूर्वसंध्या', 'रंगरेषा', 'रेशीमरेघा', 'सांगावेसे वाटले म्हणून', 'संस्मरणे', 'सुवर्णमुद्रा', 'वर्षा', 'त्रिवेणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४६६५/- । सवलत किंमत ३५६४/-**

---

**१२ ऑक्टोबर-प्रोतिमा बेदी यांचा जन्मदिन**

'टाईमपास' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१४ ऑक्टोबर - डॉ. अरुण मांडे यांचा जन्मदिन**

'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४४/-**

---

**१५ ऑक्टोबर - डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती**

'अदम्य जिद्द', 'माझी जीवनयात्रा...', 'टर्निंग पॉइंट्स', 'योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ५१०/-**

---

**१५ ऑक्टोबर - मारिओ पुझो यांचा जन्मदिन**

'ओमेर्ता', 'द लास्ट डॉन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ४४९/-**

◆


**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. **९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**

author@mehtapublishinghouse.com





# द.मा.मिरासदार


## जन्मशताब्दी वर्ष

मराठीतले साहित्यिक, कथाकथनकार, विनोदी लेखक, पटकथाकार आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष **द. मा. मिरासदार** यांची अजरामर ग्रंथसंपदा




**कादंबरी**
नावेतील तीन प्रवासी
**कथासंग्रह**
जावईबापूंच्या गोष्टी
फुकट
सरमिसळ
बेंडबाजा
खडे आणि ओरखडे
गोष्टीच गोष्टी
गप्पांगण
हसणावळ
गप्पागोष्टी
चुटक्याच्या गोष्टी
माकडमेवा
माझ्या बापाची पेंड




गुदगुल्या
हुबेहूब
भुताचा जन्म
विरंगुळा
भोकरवाडीतील रसवंतीगृह
गंमतगोष्टी
चकाट्या
भोकरवाडीच्या गोष्टी
**ललित**
अंगतपंगत
**वगनाट्य**
मी लाडाची मैना तुमची
**विनोदी नाटिका**
गाणारा मुलूख
**एकांकिका संग्रह**
सुट्टी आणि इतर एकांकिका

RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/09/2026 Posting Date : 11/09/2026

## आवर्जून वाचावं




**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,